

# श्री साई वाक्सुधा

जो मला अनन्यभावें शरण आला व जो अत्यंत विश्वासयुक्त माझें नामस्मरण करतो, ज्याला नेहमीं माझें चिंतन–स्मरण करणें आवडतें, त्याचा उद्धार करणें हेंच माझें ब्रीद आहे. जो सतत माझें चिंतन करतो, भक्तिभावानें माझी आठवण करतो, ज्याला माझी पोथी हेंच सर्वस्व वाटतें, व ज्याच्या अंतःकरणांत मी सदासर्वकाळ साठविलेला असतों, त्याच्या मनांत विषय वासनेडा किंवा दुष्ट विचारांना जागाच मिळणार नाहीं.

—श्रीसाईसच्चरित्

---


श्रीरामनवमी— श्रीसाईलीला —विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] मे १९६७ [ अंक १४ वा

: संपादक :

श्री. थी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,

प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

या जगांत शांततेसारखें सुख नाहीं. आपलें मन नेहमीं शांत ठेवण्याचा कसून प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. शांतता समाधानांत सामावलेली आहे. जेथें समाधान नाहीं तेथें शांतता कुठून मिळणार? असमाधान म्हणजेच अशांतता; अहर्निश धडपड, धडपड म्हटली म्हणजे अशांतता आलीच.

शांतता केव्हां प्राप्त होते? इच्छा, आकांक्षा, चढाओढ, अहंकार, मायाममता, अभिमान, आसक्ति ह्या साऱ्या गोष्टी अशांततेला जन्म देणाऱ्या आहेत. यापैकीं एक जरी आपल्या वाट्यास आली तरी आपण अस्वस्थ, अशांत व म्हणूनच असुखी झालेत असें निश्चित् समजावें.

ईश्वर जें जें कांहीं करतो तें आमचें मंगल व्हावें, आमचें भलें व्हावें यासाठीं करतो ह्या गोष्टीवर आपली संपूर्ण श्रद्धा असली पाहिजे. ह्यापैकीं दोन्ही गोष्टी आपल्याच हातीं आहेत. नाना विकारांच्या आधीन होऊन त्यांच्यामागें धांवत पळत रहायचें कीं, ईश्वर हा सर्वशक्तिमान आहे. तो आपलें वाईट करणार नाहीं, या गोष्टीवर संपूर्ण श्रद्धा ठेऊन जगांत वावरायचें; हें आपलें आपण ठरवायचें आहे. कोणता तरी एक मार्ग स्वीकारून त्या मार्गानें वाटचाल करीत राहिलें पाहिजे.

वासना ही शांतताभंग करणारी आहे. तिचा त्याग केल्याशिवाय, तशी मनाला संयम लावल्याशिवाय तुम्हांला शांततेच्या मार्गानें जातां येणार नाहीं. 'सुहृदं सर्व भूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति' असें भगवंतानीं सर्वांना आश्वासन देऊन ठेविले आहे. ईश्वर सर्वांचा सखा आहे. तो प्रत्येकासाठीं जें कांहीं करतो तें त्याच्या कल्याणासाठींच असते, या गोष्टीवर आपण संपूर्ण श्रद्धा ठेवून जगांत वावरूं लागला म्हणजे तुम्ही शांततेला आपल्या पकडींत धरली असें म्हणतां येईल.

आम्हीं नाना प्रकारच्या सुखोपभोगाच्या मागें लागतो. ईश्वराऐवजीं त्या भोगावर आपली लालसा चिकटलेली असते. त्या भोगामागे लागून आम्हीं नाना प्रकारची पापकर्मे करण्यास प्रवृत्त होतों. मग कुठली आली आहे शांतता! भोगाकडे सतत दृष्टी लागून राहिलेली. त्यासाठीं धडपड चाललेली. भोगाची एखादी वस्तु अविरत धडपडीनंतर समजा प्राप्त झाली तरी तेवढ्याने समाधान कुठें मिळतें आहे? आणखी अधिकाधिक मिळावें ही लालसा मनांत उत्पन्न होतेच होते. मारुतीरायाच्या शेपटी-

यारखें हें लालसेचें शेपूट उत्तरोत्तर वाढतच जातें. त्याला ना अंत ना पार. एखादी वस्तू मिळेपर्यंत धडपड. बरें ती मिळाल्यानंतर हातची गेल्याबद्दल दुःख! त्या दुःखामुळें मन सदासर्वकाळ आंतल्याआंत पिचत रहातें! त्यामुळें काय होतें? मन नेहमीं अशांत! आणि अशांत माणसाच्या वांट्याला सुखाचा कण येणार कुठून? 'अशांतस्य कुतः सुखम्!

तेव्हां शांतता प्राप्त करून घेण्याचा एकमेव नि निश्चित राजमार्ग म्हणजे भगवंताच्या कृपेवर श्रद्धा ठेवून जगांत वावरणें हाच होय.

वाटेल ते प्रयत्न करून जोंपर्यंत या जगांत मी आहें तोंपर्यंत कोणत्याही बाबतींत आसक्ति बाळगणार नाहीं. मी सदैव अनासक्त राहीन. देव ठेवील त्या स्थितींत समाधान मानून मी माझ्या वांट्यास आलेलें कर्तव्य इमानें इतबारें पार पाडण्यासाठीं सतत झटेन, हीच या जीवनांत आमची दृष्टि असावी.

आसक्ति बाळगावी, परंतु ती कोणाच्या बाबतींत? भगवंताच्या बाबतींत. या जगांत नित्य सनातन असें कांहीं नाहीं. जें आहे तें सारें अनित्य अशाश्वत आहे. आपलें असें म्हणायला या जगांत कांहीं नाहीं. मग उगाच खोट्या मोहांत सांपडून मृगजळाच्या मागें धांवण्यांत फायदा कोणता?

आपल्या सभोंवार जें वावरतें, जें जें दिसतें तें टिकाऊ किंवा कायम टिकणारें आहे असें मानून त्यावर लोभ-ममता करण्यांत फायदा कोणता? हा मार्ग मूर्खपणाचा आहे. तो पकडून आमच्या वांट्याला शांतता नि सुख कदापि येणार नाहीं ही खूणगांठ आपल्यापैकीं प्रत्येकानें मनाशीं पक्की बांधून वागण्यांतच आमचें कल्याण आहे.

—संपादक



# आत्मदर्शनाचा श्रेष्ठ अनुभव
# ज्ञानदेवांच्या अभंगवाणीचें सारसर्वस्व

—गुरुदेव रानडे

## ज्योतिप्रकाशाचा अनुभव

अनुपम तेजानें सर्व विश्व धवळलें आहे असें श्रीज्ञानदेव सांगतात. रसांत मुरले; प्रेमाचें स्फुंदन झालें; मी हरीचें रूप घनदाट पाहिलें. नादानें व ज्योतीनें आ परिपूर्ण आहे...अरुणोदय झाला व सूर्य—तेजापेक्षां सतेज तेज उजळलें. श्रीनिवृत्ता उपदेशानें श्रीज्ञानदेवांस आत्मज्ञान झालें. चंद्राशिवाय चांदणें व सूर्यावांचून पाहिल्याचें श्रीज्ञानदेव सांगतात व तेथें सर्व जगास कारण व जगत्रयाचें जीवन अ लेला देव अणुप्रमाण भासला, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. आत्मप्रकाशापुढें उणा वाटतो. येथें दिवस व रात्र दोन्ही नाहींत. अक्षय, व असामान्य अ डोळा श्रीज्ञानदेवांनीं पाहिला. उन्मनी अवस्थेंत देव पाहिला. त्या तेज सूर्य—चंद्राच्या तेजापेक्षां जास्त आहे. हा अनुभव गुरु—अनुग्रहीत आ त्यांनाच समजेल. सूर्य रात्रीं व चंद्र दिवसा प्रकाशावा, यांत कांहींच आश्चर्य ना असें श्रीज्ञानदेव म्हणतात. हा अनुभव विपरीत दिसतो. आत्म्यामध्यें उदय व अ नाहीं. तो स्वतःच स्वतःचा आरसा आहे. अनुभवीच हें जाणतात व या खुणेनें संतुष्ट होतात. "नामरूपरहित अशा सहस्रदळपत्रांत तें तेज दिसतें." तें तेज उ व थंड नाहीं हें आश्चर्यकारक होय. ही प्रभा तुर्यारूपानें दिसते व तथा प राम आहे.

## नादाचा अनुभव

रंगाचा, रूपाचा व तेजाचा अनुभव जितक्या विस्तारानें व पूर्णतेनें श्रीज्ञा देवांनीं वर्णिला आहे, तसें नादासंबंधीं नाहीं. "अनाहत नादानें सर्व वि दुमदुमतें, पण नाद कोठून येतो व कोठें जातो हें सांगतां येत नाहीं. असें ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे, हें खरें आहे. अभंगांत या अनाहत नादाचा निर्देश केला आहे; 'नादावर आत्मतेज प्रकाशतें' असें श्रीज्ञानदेव म्हणता साधु आपल्या अंतकाळाचें लक्षण ओळखतो व हीं लक्षणें कोणतीं हें श्रीज्ञानदेवा सांगितलें आहे. आपले कान झांकले व अनाहत नाद ऐकूं आला नाहीं, तर न

दिवसांनीं मरण येणार असें आत्मज्ञानें समजावें. आपल्या भिवयांकडे पाहिलें व त्या दिसल्या नाहींत, तर सात दिवसांनीं मरण आहे असें समजावें. डोळ्यांत बोटें घालून चक्रें दिसलीं नाहींत, तर पांच दिवसांनीं मरण आहे असें जाणावें. नासिकाग्रीं दृष्टि ठेविली असतां अग्र दिसलें नाहीं, तर त्या दिवशीं 'रामकृष्ण' म्हणावें. हीं मरण जवळ आल्याचीं लक्षणें आहेत. ज्यानें त्यानें मरणसमयीं याचा अनुभव घ्यावा असें ज्ञानदेव म्हणतात.

## मनाच्या सर्व अवस्थेंत देव-दर्शन

जागृति, स्वप्न, सुषुप्ति व उन्मनी या चारहि अवस्थेंत ईश्वरदर्शन घडणें शक्य आहे. या सर्व अवस्था एक झाल्या म्हणजे देव भेटतो. या सर्व अवस्थांमध्यें आत्मानुभव येतो, हें एका रूपकाच्या साहाय्यानें श्रीज्ञानदेवांनीं विशद केलें आहे. जागृतीस सजीव स्त्री कल्पिली आहे. ती म्हणते, 'मी देव अंगणांत बोलतांना ऐकिलें व त्यास वृंदावनीं स्वतः डोळ्यांनीं स्पष्टपणें पाहिलें'—स्वप्न व सुषुप्ति अवस्था म्हणतात. 'आमच्या मनास पंढरीचा वेध लागला आहे व आमचें सर्व अंतःकरण देवाच्या प्रेमानें भरून गेलें आहे. देव दिसला कीं झांजांचा आवाज गर्जेल' उन्मनी अवस्था म्हणते, 'माझें सर्वस्व देवानें नेलें, व विठ्ठलानें माझें मन उन्मनी अवस्थेंत स्थिर केलें.' दुसऱ्या एका अभंगांत श्रीज्ञानदेव सांगतात कीं, जागृति, स्वप्न व सुषुप्ति या सर्व अवस्थांमध्यें 'देवाचें रूप पाहून झालेल्या परमानंदानें मन भरून गेलें. श्रीज्ञानदेवांच्या मतें याप्रमाणें सर्व अवस्थांमध्यें ईश्वरदर्शन घडणें शक्य आहे.

## आनंदाचा अनुभव

देवाशीं ऐक्यता पावल्यानें झालेल्या आनंदाचें वर्णन श्रीज्ञानदेवांनीं अनेक प्रकारें केलें आहे. "मी देवास जाणावयास गेलों, तों जाणणेंच राहिलें, देवास पाहावयास गेलों तर देवच झालों. मुक्यास अमृताची गोडी सांगतां येत नाहीं. विठ्ठल माझ्या अंतःकरणांत जागृत राहिला आहे व ही खूण ऐकून संतजन संतुष्ट झाले. हा मौनपणें अनुभवलेला देवाच्या ऐक्याचा आनंद श्रीज्ञानदेव दुसऱ्या अनेक अभंगांत सांगतात, "माझ्या सर्व आध्यात्मिक अनुभवानें मौनच बाणलें; पुढें एक शब्दहि बोलवत नाहीं; यास काय करूं! श्रीनिवृत्तीनाथांनीं मला माझ्या देहींच विठ्ठल दाखविला; तेव्हांपासून मी नित्य नव्या रूपाचा आनंद उपभोगीत आहे." असें श्रीज्ञानदेव म्हणतात. "तुझी गुणकीर्ति ऐकून तुला भेटण्याची उत्कट इच्छा झाली. तन, मन व वाचा स्तब्ध झाली. आलिंगनासाठीं उतावळेपणानें हात उचलले; परंतु, रूप पाहतांच ते तसेच तटस्थ राहिले. डोळ्यांचीं पातीं हलेनाशी झालीं—जें रूप पाहात होतों त्याशीं मी एकरूप

झालों. ब्रह्मानंदाच्या अनुभवानें मी तृप्त झालों. मी वारंवार डुलत राहिलों. सर्व आशा सफल झाल्या. मी देहावर उदार झालों. मी–तूंपणाचा भास नाहींसा झाला. मी विठ्ठलांत मुरून राहिलों व तो आनंद सर्व संतजनांनीं पाहिला." "देव आंत व बाहेर भरला आहे. त्यास आलिंगन देण्यास गेलों, तों तोच माझ्या अंगास जडून गेला. त्यास दूर केलें तरी तो दूर होत नाहीं. जीव–शिवाची अदलाबदल झाली. त्याच्या मागें मन धांवतें, तेव्हां तो दुसरीकडेच धांवतो. परंतु एका क्षणांत पुनः तो दृष्टीपुढें राहतो व सर्व भाव स्थिर राहतात."

## आत्मदर्शनाचा श्रेष्ठ अनुभव.

श्रीज्ञानदेवांनीं आत्मदर्शनाचें वर्णन निरनिराळ्या दृष्टीनें व पद्धतीनें केलें आहे. योग्यांना दुर्लभ असा देव मी पाहिला. कितीहि पाहिलें तरी इच्छा तृप्त होत नाहीं. मी देवांचा देव पाहिला. सर्व संदेह फिटला व दुजेपण नाहींसें झालें. मी देवास अनंत वेषांत व अनंत रूपांत पाहिलें, असें श्रीज्ञानदेव सांगतात. हें वर्णन पूर्ण निश्चयानें व आत्मविश्वासाचें आहे. तसेंच शरणागतीच्या वृत्तीनेंहि आत्मदर्शनाचें वर्णन श्रीज्ञानदेवांनीं केलें आहे. "मलयानिल कापडाच्या पदरानें गाळतां येत नाहीं. फुलांचा वास गुंफतां येत नाहीं; परमेश्वर तसा आहे, असें जाणावें." "सर्वेश्वरास लहान वा थोर म्हणूं नये. त्याच्या स्वरूपाचा निर्धार कोणास करतां येईल ? मोत्याचें पाणी रांजणांत भरतां येत नाहीं. गगनास गवसणी घालतां येत नाहीं. डोळ्यांतील बाहुली निराळी करतां येत नाहीं. विठ्ठल–रखुमाईच्या भांडणांत कोण समजूत घालणार ?" श्रीज्ञानदेव विठ्ठलचरणीं शरण जातात. योगशास्त्रदृष्ट्या ईश्वरदर्शनाचें वर्णन करण्यांत श्रीज्ञानदेवांचा हातखंडा आहे. "त्रिकूटाच्या पैल्यापलीकडे औट पीठावर निरंजनदेशीं असलेलें देवाचें रूप पाहिलें. देव अर्धनारी नटेश्वर आहे व सर्वत्र भरला आहे." त्या दैवी रूपांत दिवस व रात्र लोपले. रवि–शशि त्याच्या तेजानें प्रकाशतात. नारी–पुरुष दोघे तेथें एक दिसतात, हें नवल मी पाहिलें. शिव–शक्ति त्या देवामध्यें एकरूप होतात. श्रीज्ञानदेवांस विश्वरूपाचें दर्शन घडतें व सभोंवतीं व चहूंकडे तेंच रूप दिसतें. 'स्वानुभवाची दिवटी उजळून पाहतां एकच रूप दाही दिशांस दिसलें. देव श्रीज्ञानदेवांच्या बाह्याभ्यंतर सर्व व्यापून राहिला. देवास पाहतांच श्रीज्ञानदेव त्याच्यामध्यें विरून गेले. "देवानें माझें मन मोहिलें. विसरूं तो आठव झाला व त्रिभुवन तन्मय झालें." "तें गुजगुजीत सांवळें रूप अनुभवितां मन वेडें होतें. आत्मरूपच सर्वत्र संचलें." असें श्रीज्ञानदेव सांगतात. 'मी रूपाचा दर्पण रूपेंवीण पाहिला व द्रष्टाहि नाहींसा झाला हें आश्चर्य होय. जिकडे जावें तिकडे देव सांगाती आहे. त्यास उदय, अस्त किंवा द्वैत–स्थिति नाहीं. एकच विठ्ठल समसुख ऐक्यपणें भोगतो. अदृश्य पति शेजेवर दुसरें कोणी नसतां सदैव जागा राहतो." यासच आत्म्याचें दर्शन म्हणतात. यासाठीं प्रथम देह बळी देऊन साधन करावें. त्यानें समाधान

मिळतें. "मी निराकार ब्रह्मास' भरलेल्या चंदन वृक्षाच्या रूपांत व फुललेल्या अश्वत्थ वृक्षाच्या रूपांत पाहिलें. आतां संसार पाहणें पुरे; स्वरूपाच्या आनंदांत राहणें हेंच श्रेष्ठ आहे." "मी मज पाहतां माझें मीपण हरपलें. माझें मन ठकलेंच ठेलें. आंत विठ्ठल, मीच विठ्ठल असें मला भासूं लागलें. श्रीनिवृत्तिराजानें माझें मीपण पूर्ण नाहींसें केलें." श्रीज्ञानदेवांना केवळ देवाशीं एकरूप झाल्याचाच अनुभव आला असें नाहीं तर आपण प्रत्यक्ष श्रीगुरु निवृत्तिमुनि जाहलों असा अनुभव आला. "हा ब्रह्मानंदाचा शेवट आहे." "तूं माझा व मी तुझा असें ऐक्य झाल्यावर दुजेपण कसें राहणार ? तूं तो मी, मी तो तूं बनलो. अज्ञानी लोकांना हें ऐक्य समजत नाहीं." श्रीज्ञानदेवानें चक्षूंवीणच देवास पाहिलें व हातेवीण स्पर्शिलें. तसेंच देहेंवीण देवास आलिंगिलें. "देव भेट देऊन माझ्या बरोबर कां बोलत नाहींत ? जीव लांचावला. मागें राहात नाहीं...देवास निष्ठुर म्हणवें तर तो माझा स्वीकार करतो" असें श्रीज्ञानदेव म्हणतात—देवानें श्रीज्ञानदेवांच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या. "ज्याच्या निढळीं म्हणजे कपाळावर कोटि चंद्रांचा प्रकाश झगझगतो, असा कमलनयन व हंसऱ्या चेहऱ्याचा देव हंसतो. कृष्ण श्रीज्ञानदेवांपुढें डुलतो नि डोलतो व घडोघडीं गुप्त गोष्टी बोलतो. तो उभा राहून कसा बाहू हलवितो पहा," असें श्रीज्ञानदेव सांगतात. अभंगमालेचा हा शेवट आहे. याप्रमाणें उन्मनी अवस्था प्राप्त करून घ्यायाची असते. तुर्या म्हणजेच उन्मनी, अक्षर व निर्गुण ब्रह्म होय. श्रीनिवृत्तींनीं माझ्यावर कृपा करावी व तोच अभंगाचा शेवट काय हें जाणतो. मूर्खाला हा बोध सांगूं नये. तो या ज्ञान मंदिरांत प्रवेश करण्यास अयोग्य आहे. आपली माय कोणास देऊं नये.


## सोपानदेव, मुक्ताबाई आणि चांगदेव

सोपानदेव, मुक्ताबाई व चांगदेव यांचे अभंग श्रीज्ञानदेवांच्या अभंगांइतके संख्येनें जास्त नाहींत व महत्त्वाच्या दृष्टीनेंहि कमी योग्यतेचे ठरतात. परंतु, त्यांनीं सांगितलेले अनुभव बिनचूक व खरे आहेत, यांत शंका नाहीं. देवाचें नामस्मरण करणाऱ्यांना नाना जन्म—मरणाच्या यातना सोसाव्या लागत नाहींत. जगांत सोवळें व ओवळें यांत लोक भेद मानतात, तें मूर्खपणाचें आहे, असें सोपानदेव सांगतात. या जगांत खरें सोवळें व पवित्र फक्त देवाचें रूप आहे व अभक्ताचें मनच तेवढें ओवळें आहे. एका नामानें निश्चितपणें तरून जाल. सोपान हरीवीण कांहींच व्यर्थ बडबड करीत नाहीं; म्हणून तो अखंड व प्रचंड सोवळा राहिला. देवा, सुखदुःख विरून तुझ्यामध्यें मला विरून जाऊं दे व याच जन्मीं तुझ्या नामानें संसारसागर तरून जाऊं दे. भक्तांचा नामाचा गजर देवाच्या कानीं पडतांच देव धांवून भक्तांच्या समोर येतो," असें सोपानदेव म्हणतात. मी अंध वाया जात असतां

कृपानिधि श्रीनिवृत्तिनाथानें मला सावध केलें, असें मुक्ताबाई म्हणतात. श्रीनिवृत्तिनाथांची कृपा म्हणजे नदीतटाक आहे. त्या तटाकानें जाऊन आम्ही देवास हृदयीं सांठविला व पैलतीरीं गेलों," असें मुक्ताबाई म्हणतात. "मुंगी आकाशांत उडाली व तिनें सूर्यास गिळून टाकिलें," हा आपला आध्यात्मिक अनुभव मुक्ताबाई सांगतात. त्याचप्रमाणें "वांझेला मुलगा झाला. मोठें नवल झालें. विंचू पाताळाला गेला व तेथें शेष त्याच्या पायां पडला. माशी व्याली व घार झाली व हें पाहून मुक्ताबाई हसली" असें त्या म्हणाल्या. 'दिवसा चांदणें व रात्रीं सूर्याचा उष्ण प्रकाश तुम्ही पाहिला आहे काय ?' असें मुक्ताबाई विचारतात. इतर झाडांमध्यें एक चंदनाचें झाड असलें, म्हणजे त्यानें बाकीचीं झाडें सुगंधित होतात. त्याप्रमाणें जनसमूहांत एखादा भक्त असला, तर सर्व लोक देवाची भक्ति करूं लागतात. मुक्ताबाईंनीं चांगदेवास जो उपदेश केला आहे, तो फार मोकळेपणानें केला आहे व तो बरोबर आहे. "भवनदीपासून परत फीर: तो जबरदस्त प्रवाह ओलांडून जाण्याचा प्रयत्न केलास, तर तूं


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स**, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

वाहून जाशील. भवदीचें पाणी फारच ओढतें व मी मी म्हणणाऱ्या पोहणाऱ्यास उलथून टाकतें. संसार क्षणभंगुर आहे. म्हणून तो वायां घालवूं नको. सद्गुरूस शरण जा व अंतरीची खूण दृढ धर; म्हणजे चांगदेवा, तूं उद्धरून जाशील." मुक्ताबाई चांगदेवास अबोलणें बोलण्यास सांगतात. तसेंच उन्मनी निद्रा उपभोगण्यास सांगतात. 'इतर चाळा करूं नको. मी अनुहत टाळी वाजवितें. एकवीस सहस्र वेळां होणाऱ्या श्वासोच्छ्वासाच्या दोरानें मन स्थिर कर. ना निद्रा ना जागृति अशा उन्मनी अवस्थेचा आनंद घे,' असें त्या चांगदेवास सांगतात. त्या अवस्थेंत नवरीच्या पोटीं नवरा जन्मतो आणि नवरा बाहेर येतांच त्याच्या समोरून नवरी नाहींशी होते. हा सोहळा अवर्णनीय आहे. याची खूण मुक्ताबाई चांगदेवास सांगतात. चांगदेवांना मुक्ताबाईंनीं परमार्थाचा उपदेश केला व त्याचें गुह्य समजावून दिलें. चांगदेव म्हणतात, "कुडी ही नवरी व आत्मा हा नवरा आहे." "लग्नसोहळा झाल्यावर नवरा आपल्या गांवास गेला. नवरी गजस्कंधावरून मिरवीत नवऱ्याच्या घरीं आणली. ज्याची नवरी त्याच्या हातीं देऊन मी निश्चिंत झालों," असें चांगदेव म्हणतात. मुक्ताबाईप्रमाणें चांगदेवहि म्हणतात, "मुंगीनें आकाश कवळिलें व एक मोठें नवल घडलें. एका घुंगुरड्यानें विश्व व्यापिलें. एखाद्या यंत्रांतून निघावे तसे शब्द निघतात, पण कोण शब्द बोलतो हें डोळ्यास दिसत नाहीं. रुणझुण किनरी वाजते व त्या आनंदानें त्रिभुवन गर्जतें. वटेश्वर चांगा या नादांत विरून गेला व ब्रह्म पाहतां ब्रह्मच झाला.



## रामकृष्णांना शिकावेंसें वाटलें

रामकृष्ण परमहंस शिकलेसवरलेले नव्हते! एकदां त्यांच्या मनांत आलें कीं, थोडीबहुत विद्या आपल्याला असावी. ते देवीचे मोठे भक्त होते. रात्रीं झोपेंत त्यांना स्वप्न पडलें. स्वप्नांत देवीनें त्यांना दर्शन देऊन विचारलें, "काय रे, तुझी इच्छा आहे तरी काय?"

रामकृष्ण म्हणाले, "माते, आपल्याला थोडी विद्या असावी असें वाटतें ग!"

देवीनें समोरच पडलेल्या कचऱ्याच्या ढिगाकडे हात दाखविला आणि म्हटलें, "ती पहा तिथें आहे विद्या. घे त्यांतून."

रामकृष्णांना देवीच्या सांगण्यांतील गूढ कळलें. त्यांनीं हात जोडून देवीला नमस्कार करीत म्हटलें, "माते! मला अशा प्रकारची विद्या नको ग!"

# असमाधान पाहिजे

लेखक : द. शं. टिपणीस

माणसानें समाधानी असावें. शहाण्यासुत्यांनीं केलेला हा उपदेश. समाधानी असावें हें तर खरेंच. समाधान नसेल तर आहे त्यांतून सुख कसें मिळणार? आणि सुख नसेल तर समाधान तरी कसें वाटणार? समाधानानें सुख मिळते व सुखामुळें समाधान होते. एक अध्यात्मिक व ऐहिक अशी ही सांगड आहे. समाधानानें सुख मिळतें तें अध्यात्मिक सुख मिळतें पण सुखामुळें समाधान होतें तें ऐहिक होते. समाधानी वृत्तीला दुःखाचे चटके कमी बसतात. खेळकर वृत्तींतून समाधान जन्मास येते. जग ही गंमत. घटकाभर करमणूक. चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे. खरे म्हणजे कोण कोणाला देत नाहीं व कोण कोणापासून घेत नाहीं. कोण कोणाचा नाहीं. चार दिवसाचे सारे पाव्हणे. मालकी कसली नि हक्क कसले. घटकेचे सोबती सगळे. कसली भांडणे आणि तंटे. आहे हें ठीक आहे. देव करतो ते बऱ्या करतांच करतो. हें समजून कोणतीहि गोष्ट मनाला लावून न घेतां सुखासमाधानें रहावे. शहाणी माणसें प्रवासांत कधीं भांडतात कां? क्षणैक प्रवास. सहप्रवाशाशीं गोडीनें व उदार मनानें वागून प्रवासांतील आनंद लुटतां येईल तेवढा लुटतात व अंतीं घरोघरीं निघून जातात. तसेंच ह्या जगांत गोडीनें, खेळीनें माणुसकीनें सहप्रवाशाशीं वागावें व जीवनाचा आनंद लुटावा. होईल तेवढें आपलें व इतरांचें भलें करीत राहवें. अशा वृत्तीचा माणूस समाधानी असतो. असला माणूस कमींत कमी दुःखी व जास्तींत जास्त सुखी असतो. पण ही वृत्ति निराशेंतून होतां कामा नये. जाणीवेंतून आली पाहिजे व उच्च ध्येयाकडे लागलेल्या लयांतून ही वृत्ति निर्माण झाली पाहिजे. दारिद्र्यामुळें खायला मिळत नाहीं म्हणून उपवास करणें निराळें व घरीं लक्ष्मी पाणी भरीत असतां एकाद्या उच्चकार्य सिध्यर्थ पाणीहि न घेतां उपास करणें निराळें. निराश झाल्यामुळें समाधान मानून घेऊन जगाकडे बेदरकारपणें पहाणें निराळें व जगाचें ज्ञान होऊन त्याकडे एक गंमत जंमत या दृष्टीनें पहाणें निराळें. निराशेने लादलेलें समाधान हें खरें समाधान नव्हे तर राजीखुशीनें मनाने मानलेलें समाधान हें खरें समाधान आहे. अशा समाधानानें सुख होतें तें आध्यात्मिक अंतरंगांत मनांत. यासाठीं अगोदर अध्यात्मिक प्रगती झाली असली पाहिजे. दृष्टी विशाल पाहिजे. असें समाधान साधुसंतांच्या ठिकाणीं असते.

सुखदुःख समकृत्वा ही वृत्ती त्यांची असते म्हणून ते चिरंजीव सुख व आनंदांत सदैव गुंग होऊन गेलेले असतात.

परंतु सुखापासूनही समाधान होतें. जें पाहिजे तें मिळालें कीं सुख वाटतें. मनाला समाधान वाटतें. लहान मुलाला लाडू मिळाल्याचें हें समाधान. हे ऐहिक समाधान झालें. तें टिकावू नाहीं. त्याचें जीवन क्षणैक असते. ऐहिक सुखच मुळीं क्षणैक, मग त्यांतून निर्माण झालेलें समाधान क्षणैक असल्यास नवल नाहीं. सुखांतून निर्माण झालेलें सुख चिरंजीव असते. असें असलें तरी एकंदर मानव अध्यात्मापेक्षां ऐहिक सुखाकडे जास्त झुकलेला असतो, म्हणून अध्यात्मांत ऐहिक सुखाचा विचार होणें जरूर आहे. ऐहिक समाधान टिकावू तर नाहींच उलट त्यांतून असमाधान जन्मास येते. समाधानामागोमाग असमाधान, बेचैन, शारीरिक व मानसिक अस्वस्थता येत असतात व तसे त्या येतात म्हणून जगाची चाल पुढे पुढे चालू आहे. सुखामुळें समाधान वाटतें, ते लवकरच लय पावते व असमाधान वाटूं लागून सुख मिळविण्यासाटीं माणुस धडपड करतो. असमाधान माणसाला कार्यप्रवृत्त करणारे आहे. माणूस समाधानी असता तर आदि मानवाकडून अति-मानवाकडे त्याची चाल चालू राहिली नसती. माणसाला असमाधान वाटते म्हणून प्रगति होत आहे. ऐहिक जगांत हें जितकें सत्य आहे तितकें तें अध्यात्मिक जगांतही सत्य आहे. जी कांहीं आपण भक्ति करीत आहोंत त्यापेक्षां अधिक कांहीं तरी केले पाहिजे, करीत असलेल्या भक्तीनें मनाचे समाधान होत नाहीं, कांहीं तरी अपुरे आहे तें केलें पाहिजे अशी जेव्हां तळमळ लागते व अपुरे पुरे करण्याचा, कमी ते भरून काढण्याचा मार्ग तो जेव्हां शोधू लागतो व नाना खटपटी व प्रयत्न करून, कष्ट सहन करून जें नव्हतें कीं ज्यामुळें असमाधान वाटे तें जेव्हां मिळवतो व अपुरे पुरे करतो तेव्हां तो प्रगतीचा टप्पा गांठतो व त्याची अध्यात्मिक ताकद वाढते, ऐहिक गाष्टींत असाच प्रकार होतो.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनांत कांहीं तरी कमी आहे असे वाटतें. सगळें वैभव असलें तरी अधून मधून जीवन हें मिळमिळीत आहे असें वाटतें. कांहीं तरी कमी आहे. अपुरेपणाची भावना वेळोंवेळीं जीवनांत डोकावत असते. पाहिजे तें मिळालें तरी कांहीं तरी कमी आहे ही हुरहुर जात नाहीं. पण नेमकें काय कमी आहे हेंच कळत नाहीं. कोणाला वाटते पैसा कमी, कोणी समजतो कीर्ति कमी, कोणाची खात्री ऐहिक सुख कमी, कोणी कांहीं कोणी कांहीं मनाशीं ठरवितो व तें पदरांत पाडून घेण्याचा म्हणजे त्याच्या मनाप्रमाणें जीवन पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. यश येतें. पण परिणाम काय ? तर पुन्हा कमतरता वाटतेच. अपुरेपणाची जाणीव घेऊनच मानव जन्माला आला आहे. ही जाणीव आहे म्हणूनच प्रगति होत

आहे. अपुरेपणांतच पूर्णत्वाची बीजे असतात. अपुरे आहे तेंच पूर्ण करतां येते व होते. भरलेले भांडे कां भरतां येईल ? पूर्ण वाढलेला वृक्ष कां आणखी वाढेल ? रोपटेंच वाढूं शकेल. मानवी जीवन हे रोपटें आहे. तें अपुरे आहे. त्यांत कमतरता आहे. म्हणूनच तें पूर्ण करण्याची व होण्याची आशा आहे. ही कमतरता असमाधान उत्पन्न करते. पण कशाची कमतरता आहे, कशाची भर घालावी म्हणजे तें पूर्ण होईल हेंच समजत नाहीं. तें समजलें कीं जीवन पूर्ण झालें. साधुसंत हें जाणतात. म्हणून त्यांचें जीवन पूर्ण असते. म्हणूनच ऐहिकाला अध्यात्माची जोड पाहिजे. नाहींतर असमाधान वाढत राहाणार. असमाधानामुळें होणारी अध्यात्मिक प्रगति मानवाला अतिमानवाच्या दिशेकडे नेते तर असमाधानांतून उदय पावलेली केवळ ऐहिक प्रगति मानवाकडून त्याला आदि मानवाकडे घेऊन जाण्याचा धोका असतो. असमाधानामुळें ज्ञानवृद्धि त्यामुळें साधनवृद्धि, त्यामुळें सुखवृद्धि व सुखाला चिकटून असलेली दुःखवृद्धि होऊन मानवाची प्रगतिबरोबर परागतीही होण्याचा संभव असतो. दोष असमाधानाचा नसून साधनाचा उपयोग करणाऱ्या मानवाचा आहे. फायदे तोटे कांहींहि असलें तरी प्रगतीसाठीं असमाधान असणें जरूर आहे एवढें मात्र खरें. याला इतिहास साक्ष आहे.

जगाच्या प्रगतीचा इतिहास पाहिला, शास्त्रीय ज्ञानाची वाढ व त्यामुळें ऐहिक सुखाची झालेली वाढ पाहिली तर असें दिसते कीं, प्रगति वा सुखाच्या वृद्धीस कारणीभूत कांहीं झालें असेल व होईल तर तें असलेल्या परिस्थितीबद्दल असमाधान होय. असमाधानांत नावड आहे. आहे तें आवडत नाहीं, त्याऐवजीं दुसरें कांहीं मिळवावे असें वाटतें व बुद्धि तें कसें मिळवावे याचा मार्ग शोधूं लागते. तदनुरूप कष्ट करून मानव पाहिजे तें सुख पदरांत पाडून घेतो, व घटकाभर सुखी होतो. पण घटका दोन घटका जातात न जातात तों अमूक नाहीं म्हणून पुन्हां असमाधान हुरहुर वाटूं लागतें; व ती हुरहुर घालविण्याच्या मार्गे माणूस लागतो. माणसाच्या या असमाधानामुळें नाना शास्त्रीय शोध लागले आहेत. Necessity is the mother of invention असें म्हणतात. Necessity वाटतें कारण कांहींतरी कमतरता आहे म्हणून व कमतरता ही मनाचें समाधान करणारी नसून असमाधान करणारी आहे. असमाधान हें माणसाच्या प्रगतीचें मुळ आहे. समाधान जैसे थे करणारे आहे. समाधानांत निष्क्रियता आहे तर असमाधानांत क्रियता आहे, धडपड आहे, चळवळ आहे. समाधान म्हणजे शांत, संथ वाहणारी नदी. तर जीवनाच्या खांच, खळगे, खडक असलेल्या पात्रांतून खवळून उफाळून धडपडत जाणारे पाणी म्हणजे असमाधान. संथ वहाणारी नदी

आपलें पाणी आजूबाजूच्या प्रदेशांत पसरवून तीं सुपीक करूं शकत नाहीं. पण तीच पावसाळ्यांत दुथडी वाहूं लागली तर पाण्याचा व्याप वाढून तें मैलन मैल पसरते व तिच्या गाळामुळें जमीन सुपीक होऊन पीकपाणी चांगलें येतें. असमाधान बुद्धीच्या प्रदेशांतून दुथडी वाहूं लागले तर बुद्धि सुपीक होऊन तिच्यांतून विविधप्रकारच्या शोधांची पिकें निर्माण होतात. वेळीं बेफाम नदीप्रमाणें तें नुकसान करूं शकतें हें खरें असलें तरी योग्य मानसिक यंत्रणा असलेल्या पात्रांतून ते वाहत असलें तर तोट्यापेक्षां फायदा अधिक करूं शकते. असमाधानांत चीड आहे. जगांतील मोठमोठ्या क्रांत्या असमाधानामुळें जन्मास आल्या. मोठमोठी वैभवशाली राज्ये स्थापन केली गेली ती असमाधानामुळें प्राप्त परिस्थितीबद्दल असमाधान हे मूळ असते. परकीय सत्तेच्या राजकीय कारभारामुळें असमाधान निर्माण झालें नसतें तर शिवछत्रपतींनें हिंदवी स्वराज्य स्थापन झालें नसतें. इंग्रज आले. त्यांनीं आपल्याबरोबर शांतता व सुरक्षितता आणली. यामुळें हिंदी जनता समाधानानें इंग्रज अंमलाखालीं नांदूं लागली. परंतु परकीय अंमलामुळें आपल्यांत निर्माण झालेली कमतरता व आपल्यावर पडलेली बंधनें याची जाणीव जनतेला हळुहळू होऊं लागली व पुढें राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं तिची तीव्रता जनतेच्या ध्यानांत आणून दिली. यामुळें असमाधान वाढीस लागून जेव्हां त्यानें उच्चांक गांठला तेव्हां रक्तहीन क्रांति होऊन सत्तेचा खांदेपालट झाला. तत्कालीन राज्यकर्त्यांबद्दल असमाधान वाटले नसते तर आज आपण स्वातंत्र्य भोगूं शकलो असतो काय? सतराव्या शतकात असमाधानाचा ओघ विज्ञानाच्या प्रांतांतून वाहूं लागला व तेव्हांपासून निसर्गावर मात करण्यास मानवानें सुरवात केली व बुद्धीच्या साह्यानें निसर्गांतील नाना गुपितें हुडकून काढून आपल्या कामास जुंपलें व अनेक ऐहिक सुखें पदरांत पाडून घेतली. आदिमानवापेक्षां आजचा मानव अधिक सुखानें रहात आहे. कोणाला ना कोणाला तरी आहे त्याबद्दल असमाधान वाटले व त्यामुळें चालू अडचणीवर मात करण्याची ईर्षा निर्माण झाली म्हणूनच ना नाना शास्त्रीय शोध लागले? फ्लेमिंगने तत्कालीन अँटिसेप्टीकबद्दल समाधान मानून तो स्वस्थ राहिला असता तर पेनि-सिलीनचा शोध लागला असता कां? आणि त्यामागोमाग अनेक 'मायसीन' अस्तित्वांत येऊन त्यामुळें आज रोग्यांच्या यातना व जीव हातोहात वांचविले जात आहेत तें घडलें असतें काय? न्यूकोमेननें पाणी खेचायचा पंप शोधून मानवाचे श्रम व पैसे यांची बचत केली हें पाहून मानवाला घटकाभर कौतुक वाटलें खरें, पण लगेच प्रवास व ओझीं ओढण्यांत अशी श्रम व वेळ बचत करण्याची सोय नाहीं म्हणून मानवी मनाला खंत वाटूं लागली, असमाधान वाटूं लागलें. परिणामी स्टीफनसननें पुढें येऊन इंजिनचा शोध लावून या बाबतींत मानवाला सुखसमाधान मिळवून दिलें.


पण माणसाच्या मनाला कधीं तरी समाधान वाटले आहे काय ? आहे पेक्षां नाहींकडे अधिक लक्ष. म्हणून तो कधीं स्वस्थ बसत नाहीं. पक्षांना उडतांना पाहून आपणास आकाशांत त्यांच्याप्रमाणें भराऱ्या मारतां येत नाहींत म्हणून तो खट्टू झाला. आहे त्या सुखांत हें कमी म्हणून त्याला असमाधान वाटूं लागलें व त्याचें मन कल्पनेनें पक्षाप्रमाणें आकाशांत भराऱ्या मारूं लागले. परिणामीं त्यानें आकाश जिंकले. पक्षाप्रमाणें तो आतां उंच भराऱ्या मारतो. जमिनीवरून व आकाशांतून आरामशीर व वेगावें मजेंत प्रवास करतो; एवढेंच नव्हे तर जमिनीवरीलप्रमाणें आकाशांत मारामाऱ्या व ठोकाठोकीहि करतो. डोळ्याला सर्व दिसत नाहीं या असमाधानामुळें दुर्बिण जन्मास आली व तिनें पदार्थांत व हवेंत असलेल्या सूक्ष्म जंतूंचें ज्ञान मानवाला करून दिले. पण एवढ्यानें कां मानवाचें समाधान होणार ? ह्या जंतूंचें अधिक ज्ञान मिळविल्याशिवाय त्याला स्वस्थ बसवेना व त्याचा असमाधानाचा ओघ जंतूंशास्त्रांतून वाहूं लागला. कष्ट व बुद्धीच्या जोरावर आपल्या ज्ञानांत भरपूर भर टाकून त्यानें नाना शोध लावले व असाध्य रोग साध्य करणारीं औषधें शोधून काढली. म्हणूनच ना आज डॉक्टर लोक खिशांत पैसा टाकून सुखानें रहात आहेत. नाहींतर ६०–७० वर्षांपूर्वी आमच्या वैद्यांपैकीं कित्येकांचे खिसे राहोत, पण पोटेंही धड भरत नव्हती. निसर्गाच्या अनेक गोष्टीवर विजय मिळविल्याचें मनाला समाधान वाटतें न वाटतें तोंच ताठरपणें मान उंच करून आपल्याकडे पाहणारें तें अत्युंग शिखर मानवाच्या लक्षांत आलें. " रे मानवा, आकाशांत भराऱ्या मारतोस म्हणून बढाई नको मारूंस. माझी मान अजून ताठ आहे. मानव ती आवळूं शकणार नाहीं. " लगेच मोहिम सुरूं. यशाखेरीज समाधान नाहीं. कष्ट, हाल, मृत्यु या दोरांच्या साह्यानें शेवटीं मानवांचा जागतिक झेंडा गौरीशंकरवर फडकला. हायसें वाटलें. पण गौरीशंकर जिंकल्यावर त्याच्याहीपेक्षां उंच असलेला चंद्र कसा दृष्टीआड होईल ? रामाप्रमाणें चंद्रासाठीं त्याचें मन हट्टून बसलें. तो हातीं लागल्याखेरीज समाधान नाहीं. आरशांत नव्हे आकाशांतच तो हातीं लागला पाहिजे. सर्व प्रकारें हाताळता आला पाहिजे. त्याशिवाय समाधान नाहीं. झालें. लगेच बुद्धीची जिद्द पणास लागली. प्रयत्न व कष्ट सुरूं आहेत. आज ना उद्यां मानवाला यश मिळेल. म्हणून कांहीं तो स्वस्थ बसणार नाहीं. मानवाची दृष्टी विशाल झाली आहे. आणखी कांहीं त्याच्या दृष्टीपथांत येईल. त्यांतील यश हस्तगत केल्याखेरीज त्याला समाधान वाटणार नाहीं. पुन्हां प्रयत्न, कष्ट, यश व समाधान. पुन्हां असमाधान मग कष्ट, श्रम, यश, व समाधान. निसर्ग नवे नवे अडथळे व अडचणी निर्माण करून वारा घालत आहे व चेतवीत आहे. कधीं ऐकले नव्हते असे अपघात रोगराई व नाना अडचणी त्याच्या मार्गांत येत आहेत. एकावर मात करावी तर दुसरी हजर. संकटांची अडचणींची न संपणारी परंप-

राच व त्यामुळें असमाधान, श्रम, कष्ट, यश हा आवर्त दर्शांश. मुद्दा हाच कीं असमाधान, श्रम, कष्ट, यश, व त्यांतून असमाधान श्रम, कष्ट, यश व पुन्हां असमाधान वगैरे असें रहाटगाडगे शतकानु शतके चालूं आहे व त्यांतून प्रगतीचें पाणी जगाला मिळून त्याची वाढ होत आहे. असमाधानांतून जन्मास आलेली निसर्गाबरोबरची ही शर्यत जगाची प्रगति करीत आहे. त्याला सुख अर्थात ऐहिक सुख देत आहे. हा जसा मानवाचा मोठा फायदा होत आहे तसाच त्याबरोबर अध्यात्मिक तोटाही भरपूर होत आहे. ऐहिक सुखामुळें मानव अध्यात्मिक सुखाला पारखा होत आहे. बहिरंगांत श्रीमंत असलेला मानव अंतरंगानें दरिद्री होत चालला आहे. शरिराची अतिमानवाच्या दिशेनें वाढ होत असली तरी अंतरंग आदिमानवाकडे अधिकाधीक झुकूं लागले आहे. दोन्ही रंगांचा समन्वय होईल तेव्हांच मानवतेचा रंग खुलून दिसेल. वाटचाल करतां करतां शास्त्रज्ञ जेव्हां, ज्या ठिकाणीं ऋषिमुनी गेले आहेत त्या ठिकाणीं येतील तेव्हां त्यांची व शास्त्रज्ञांची हातमिळवणी होऊन या जगावर मानवाऐवजी अतिमानव दिसूं लागेल.

मुळांत एकाचें द्वित्व होऊन जगाचें रहाटगाडगे चालूं झालें. म्हणून जगाचें रहाटगाडगे चालूं राहण्यास द्वित्वाची जरुरी आहे. गुणानें भिन्न व कांहीं अंशी अभिन्न असलेल्यांच्या जोड्या उत्पत्तिकर्त्यानें लावून दिल्या आहेत. चांगल्याबरोबर वाईटही असते. अमृताबरोबर विषही आलें. पण विषाचें अमृत करण्याची ताकद मानवांत आहे. यामुळें माणूस वाईटांतून चांगले घडवून आणतो. मातींतून सोने काढतो व कोळशांतून हिरे वेंचतो. जें वाईट त्यांत चांगल्याची बीजें असतात व चांगले त्यांत वाईटाची बीजे असतात. शुद्ध चांगले व शुद्ध वाईट असें कांहीच नाहीं. जें आहे तें मिश्रण आहे. चहा ( पितो तो ) हें मिश्रण आहे. ज्यांचें मिश्रण आहे त्या प्रत्येकाचे थोडेफार गुणधर्म त्यांत आहेत. जग हें द्वंदांचें मिश्रण आहे. द्वंद हा विरोधाभास आहे. योग्य विरोधांतून चांगलें निर्माण होऊं शकते. विरोधांत अविरोधापेक्षां प्रगति अधिक जलद होते. म्हणूनच कुंतीनें कृष्णाकडे कृपेक्षां संकटाची याचना केली व तुकाराम महाराजांना आपला शेजारी निंदक असावा असें वाटत होते. म्हणून असमाधानांत केवळ वाईट अगर टाकावूं असें कांहीं नाहीं. ज्याची जशी ताकद तसें त्यांतून निर्माण होईल.

असमाधानांतून कल्याण होण्यासाठीं तें स्वार्थांतून नव्हे तर परार्थांतून निर्माण झालेलें पाहिजे. अपुरे पुरे करण्याच्या हुरहुरींतून जन्मास आलेलें पाहिजे. असें असलें तरी केवळ असमाधान प्रगति घडवून आणणार नाहीं. नुसती वीज कार्य करूं शकत नाहीं. तिला इतर कांहीं यंत्रणेची जरूर असते. असमाधान सर्वांनाच वाटतें. लोकांची दुःखें पाहून अनेकांची अंतःकरणें हेलावतात.

म्हणून कांहीं अशा लोकांकडून मोठा पराक्रम होतो असें नाहीं. नुसतें असमाधान उपयोगी नाहीं. त्याला निरीक्षण व तीव्र बुद्धीची जोड पाहिजे. पण एवढ्यानें काम भागणार नाहीं. आपोआप आयते कांहीं आपल्या पदरांत येऊन पडत नाहीं, श्रम केले पाहिजेत. कष्ट सहन केले पाहिजेत. तितिक्षा पाहिजे. तेव्हां कोठें प्रगति, पराक्रम, कल्याण होते. अपुरेपणाची जाणीव, निरीक्षण, तीव्र बुद्धि, तितिक्षा व जिज्ञासा असलेला मानव निर्माण होतो तेव्हां त्या माणसाच्या असमाधानांतून जगाची प्रगति, अध्यात्मिक वा ऐहिक सुखाची वृद्धि होत असते. संत व शास्त्रज्ञ हे अशा मानवापैकीं आहेत.



MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934

*Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

# रामभक्त जटायू

"हा सीते, हा लक्ष्मणा !" रामाच्या आवाजांत आलेल्या या मारीचाच्या आक्रोशानें सीता फसली. बादळाच्या तडाख्यांत सांपडलेल्या केळीसारखी थरथर कांपत ती लक्ष्मणाला म्हणाली, "तुला नाहीं ऐकू आला का हा तुझ्या बंधूचा आवाज ?"

ती आधींच भयभीत होऊन गेली होती. तशांत लक्ष्मण जागेचा हालायलाही तयार नाही हे पाहातांच ती पुन्हा त्याची करुणा भाकू लागली.

"रामावर कांहीं संकट आलं आहे हें निश्चित. आतां विलंब लावण्यांत अर्थ नाहीं. त्याचा आक्रोश ऐकला नाहींस का तूं ? मग असा इथें निश्चल उभा कां तूं ? राक्षसांनीं रामाला वेढलं असलं पाहिजे. असं असतांना त्याच्या साहाय्यार्थ धावून जाण्याऐवजीं तूं इथें मख्ख उभा कसा ?"

लक्ष्मण राक्षसांना चांगलाच ओळखून होता. तशांत "आश्रमांतून हलूं नकोस," हे रामाचे शद्बहि त्याच्या कानांत अद्यापि घुमत होते. तो आश्रमांतून बाहेर जायला तयार नव्हता.

सीतेचें मन संशयानें कलुषित झालें नि ऊर बडवून घेत ती संतापानें लक्ष्मणाला म्हणाली, 'सौमित्रा, तूं आमचा वैरी तर झाला नाहींस ? आजवर बंधुप्रेमाचं सोंग करीत आलास ते सगळं खोटंच होतं ! रामाचा अंत कधीं होतो याचीच आजवर तूं प्रतीक्षा करीत होतास वाटतं ? रामाच्या पश्चात् मी तुला मिळेन या आशेवर तूं हें नाटक करीत राहिला होतास ? तसं नसतं तर चांडाळा, या क्षणीं तूं इथेंच मख्खासारखा कसा उभा राहिला असतास ? दुष्ट, नीच, पापी !"

सीतेचे हे शब्द विषारी बाणांसारखे लक्ष्मणाच्या कानांत घुसले. दोन्ही हात कानांवर धरून तो शांतपणें सीतेला म्हणला, "वैदेहि, जिंकतां येणार नाहीं असा रामाला कोण शत्रु आहे ! माई, रामांची विवंचना करायचं कांहीं कारण नाहीं. शांत हो. उभ्या पृथ्वीतलावर असा कुणी नाहीं की जो रामाच्या केसालाहि धक्का लावू शकेल. माई, आतां तूं जें म्हणालीस तें तुला शोभत नाहीं. भीतीचं किंवा दुःखाचं कांही प्रयोजन नाहीं. राम लवकरच तुला हवा असलेला कांचनमृग घेऊन येतो कीं नाहीं तें पाहा.

ऐकायला आलेला आवाज रामाचा निश्चित नव्हता. त्या राक्षसाची ती लबाडी असली पाहिजे. त्याच्या जाळ्यांत सांपडूं नकोस. कोणत्याही परिस्थितींत तूं आश्रमातून हलूं नकोस, अशी रामाची मला आज्ञा आहे. तुला एकटीलाच इथें सोडून जावयास मला सांगू नकोस. रामाच्या आज्ञेचा भंग मी कसा करूं? जनस्थानातील राक्षसांच्या वधांचा सूड घेण्याचा प्रयत्न राक्षस नाना प्रकारें करीत आहेत. त्यांच्या फसव्या रूपांना नि आवाजांना आपण बळी पडतां कामा नये. माझी खात्री आहे कीं तो आक्रोश रामाचा नव्हता. यत्किंचितहि भीति बाळगायचं तुला कारण नाही."

पण सीतेला हें कांहीं समजत नव्हते. तिचे डोळे खदिरांगारासारखे लाल झाले होते. क्रोधयुक्त आवाजांत ती लक्ष्मणाचे पुन्हा वाभाडे काढूं लागली, "रामाच्या आज्ञेचं निमित्त करून तूं त्याला मृत्यूच्या मुखांत जातांना उघड्या डोळ्यांनीं नि बुद्धिपुरस्सर पाहात आहेस. आम्हां उभयतांनाहि तूं किती वर्षं अशा प्रकारें फसवीत आला आहेस, हें पाहिलं म्हणजे मनाला वेदना होतात. नीचा, तूं स्वतःला रामाचा भाऊ म्हणवितोस? रामाचे प्राण धोक्यांत आहेत या कल्पनेनें तुला आनंद होत आहे. तूं आमच्याबरोबर वनवासांत कशासाठीं आलास हें आतां मला उमगलं. तुला भरतानें तर आमच्या वाइटावर पाठविलं नाहीं? तसं नसतं तर तुम्ही सर्वचजण रामाच्या जिवावर कसे उठलां असता? तुम्हीं लोकांनीं रामाविरुद्ध कांहीं कट तर रचलेला नाहीं? यापुढें तुम्हां लोकांचं तोंड तरी मी पाहिन असं वाटतं का तुम्हांला? रामानें इहलोक सोडला तर मीहि निश्चित तोच मार्ग पत्करीन हें लक्षांत ठेव."

लक्ष्मण तर पुरता गांगरून गेला होता. सीतेचे ते निर्दय शब्द त्याचें हृदय विदीर्ण करून टाकीत होते. त्याच्या अंगांगांवर रोमांच उभे राहिले होते. दोन्ही हात जोडून तो सीतेची विनवणी करीत म्हणाला, "माते! देवी! तुझ्या मुखांतून हे शब्द बाहेर तरी कसे पडतात! माझ्या कानांत कुणीतरी तापलेली सळी खुपसतो आहे, असं मला वाटूं लागलं आहे. तुझे उद्गार नुसते निर्दयच आहेत, असं नसून ते अन्यायकारकहि आहेत. देवांना स्मरून मी सांगतों, कीं तुझ्या मनांत मजविषयीं आलेले सर्व विकल्प खोटे आहेत, धादांत खोटे आहेत. दुसऱ्याविषयी उतावळेपणानें वाईट शब्द काढावेत हा इतर स्त्रियांत दिसणारा क्षुद्रपणा तुझ्यांतहि असेल, असं मला वाटलं नव्हतं. माझं मन मला सांगत आहे, कीं तुझ्यावर कांहीं तरी महान् संकट येऊं घातलं आहे. तसं नसतं तर हीं वाणी तुझ्या तोंडून निघती ना!"

लक्ष्मण धीर करून हें सगळें बोलला खरें, पण कांहींतरी भयंकर घडणार आहे या कल्पनेनें तोहि भयभीत होऊन थरथर कांपत होता.

सीता म्हणाली, "तूं माझी काळजी करूं नकोस. असाच्या असा तूं आतां इथून निघून रामाच्या साहाय्याला गेला नाहींस, तर मी स्वतःला जाळून तरी घेईन

किंवा गोदावरींत जाऊन उडी घेईन. निघतोस, कीं घेऊं मी आत्मघात करून ? ”

ती करीत असलेला आक्रोश लक्ष्मणाला ऐकवत नव्हता. त्याची सहनशक्ति संपुष्टांत आली होती. सीतेला वंदन करीत तो म्हणाला,

“ठीक आहे माई. रामाची आज्ञा दूर सारून मी तुझी आज्ञा शिरसावंद्य मानतो. मी गेल्यावर तू आश्रमांत एकटीच असशील. पण देव तुझं कल्याण करतील. या अरण्यांतील देवता तुझ्या संरक्षणासाठी धावून आल्याशिवाय राहणार नाहींत. शकुन कांहीं मला चांगले दिसत नाहींत. मनाला कसलीतरी भीति वाटत आहे. तुम्हा उभयतांना मी एकत्र कधी पाहीन असं मला वाटत नाहीं. तुझी आज्ञा आहेच तर मी जातों तर ! ”

आणि तसाच तो झपाट्यानें निघाला. एकदाहि त्यानें मागे वळून पाहिलें नाहीं. दुःख आणि संताप या दोन्ही भावनांनीं लक्ष्मणाचें अंतःकरण भंगून गेलें होतें. सीतेचे ते भयंकर शब्द अजून त्याच्या कानांत घुमत होते. ‘ कसं काय आपण हे सारं सहन केले ? विसरू म्हटलं तरी कसे काय आपण हे शब्द विसरू शकणार आहोंत ? आपल्या भावाच्या सेवेसाठीं आपण सर्वस्वावर उदक सोडून इथवर आलों, नि काय फळ मिळालं आपल्या या त्यागाचं ? ’ त्याचें हृदय शतशः विदीर्ण होऊन गेलें होतें.

राम ज्या दिशेनें गेला तीच दिशा त्यानें धरली. रावण या संधीची वाट पाहात होताच. लक्ष्मण आश्रमाबाहेर पडतांच संन्याश्याच्या रूपानें तो वेदमंत्रांचा घोष करीत पर्णकुटीसमोर येऊन उभा राहिला. ‘ मुखमें राम बगलमें छुरी ? ’

राम गेला त्या दिशेकडे डोळे लावून सीता दारांतच उभी होती.

तिला पाहातांच शूर्पणखेनें त्याच्या मनांत लावलेलें वासनेचें रोपटें फोफावूं लागलें नि पाहातां त्याचा भला मोठा वृक्ष झाला. त्याचें मन आतां त्याला अनावर झालें होतें कांहींही करून सीतेचें अपहरण केलेंच पाहिजे हा त्याचा निर्धार आतां पक्का झाला.

काषायवस्त्रे परिधान करून दारीं आलेल्या या संन्याशाला पाहातांच, सीतेनें त्याला वंदन केले आणि त्याला आश्रमांत बोलावून बसावयास आसन दिलें रीतीनुसार कांहीं फळें नि कंदमुळेंहि तिनें त्याच्यासमोर आणून ठेवलीं.

संन्यासी तिच्याकडे अधीर दृष्टीनें पाहात होता, त्याचें रक्त पेटले होतें. तो महापापी नि राक्षस असला तरी आपण नेहमीसारखी बळजबरी न करतां हिचे मन वळविलें पाहिजे, हे त्यानें हेरलें. हिचें नुसतेंच अपहरण आपल्याला करावयाचें नसून, तिच्या संमतीनेंच तिच्याशीं विवाहबद्ध व्हावयाचें आहे, हे तो विसरला नव्हता.

आपण तिचे मन वळवू शकूं असा आत्मविश्वास त्याला वाटत होता. दरिद्री

रामाला सोडून ती आपल्या अपार संपत्तिमागे नि सामर्थ्यामागे धावत येईल, असे त्याला वाटत होते. रामाचा यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेने सूड घेतां येणार नाहीं, अशी त्याची मनोधारणा झाली होती. इतर स्त्रियांसारखीच सीताहि वागल्याशिवाय राहणार नाही, असे त्याचें मन त्याला सांगत होते.

सीतेच्या सौंदर्याचे अपूर्व गोडवे गात त्यानें तिला विचारले, "सुंदरी, तू कोण आहेस ? राक्षस नि श्वापदं यांनीं भरलेल्या या भयंकर अरण्यांत तू एकटीच कशासाठीं वास करून राहिली आहेस ?" हे भाषण संन्याश्याच्या तोंडी शोभत नाही याचें त्याला भानच राहिलें नव्हतें.

हे शब्द ऐकतांच सीता दचकली. राम एवढ्यांतच परत येईल या आशेनें तिनें दाराकडे नजर लावली.

हळू हळू रावणानें आपण कोण आहोंत हें तिला सांगितलें आणि आपल्या अपार वैभवाचें नि कुळाचेंही भरघोस वर्णन त्यानें केलें. मग रामाची निंदा करून झाल्यावर तो तिला म्हणाला, "माझ्याशीं विवाहबद्ध हो नि सुखासमाधानांत काल-क्रमण कर. इथें या भिकार पर्णकुटींत काय करतेस ? चल माझ्याबरोबर !"

तो कोण आहे हें माहीत असूनसुद्धां, सीता संतापून उठली नि म्हणाली "हलकटा, आपला विनाशकाळ जवळ येऊं नये असं वाटट असेल तर तूं तात्काळ इथून निघून जा"

संतापलेल्या नागिणीसारखी ती बोलत होती.

यावर राग अनावर होऊन रावणानेंहि आपलें वैराग्याचें रूप टाकून दिलें आणि एका हातानें तिचे केस धरून नि दुसऱ्या हातानें तिला उचलून, तो वृक्षामागें दडवून ठेवलेल्या रथांत बसला आणि त्यानें तिच्यासह उड्डाण केलें.

सीता आक्रोश करूं लागली, "रामा, लक्ष्मणा, कुठें आहांत रे तुम्ही ? लक्ष्मणा, तुला मीं आश्रमांतून बाहेर जायला सांगितलं. केवढा मूर्खपणा करून बसलें मी !"

रावणानें तिला घट्ट धरून ठेवलें होतें. वृक्षलतांची विनवणी भाकीत ती हा सारा वृत्तान्त रामाच्या कानांवर घाला असें त्यांना सांगत होती.

तेवढ्यांत, एका वृक्षाच्या फांदीवर बसून पेंगत असलेल्या जटायूला रावणाचा रथ दिसला. तिचा आक्रोश ऐकतांच त्यानें दचकून वर पाहिलें तो त्याला सीता दिसली. त्यानें तत्क्षणीच तिला ओळखलें. सीतेनेंही त्याला पाहिले नि आपली मुक्तता करण्यासाठीं ती त्याची विनवणी करूं लागली.

तिची ती असहाय अवस्था पाहतांच जटायु संतापून उठला नि रावणाच्या रथाजवळ येऊन तो म्हणाला, "थांब, काय चाललंय हें ?"

सीता म्हणाली, “ लंकेचा राजा रावण माझं अपहरण करून मला बळजबरीनें नेऊन चालला आहे. पण तुझा काय उपाय चालणार इथें ? असाच उडत उडत राम लक्ष्मणांकडे जा नि त्यांना हा सारा वृत्तांत सांग.”

पण जटायूचा जन्म आकाशांत निर्भयपणें संचार करणाऱ्या पक्षिराजाच्या उच्च कुळांत झालेला होता. त्याचें रक्त सळसळत होतें, त्याला दशरथराजाची आठवण झाली. दशरथानें रामाला दिलेलें आश्वासनही त्याला आठवलें आणि आपण जिवंत असेतोंवर तरी हा अत्याचार आपण पाहातां कामा नये, असा त्यानें निर्धार केला.

रावणासमोर येऊन तो म्हणाला, “ मी गरुडांचा राजा जटायु. तुझ्यासारखाच मीहि एक राजा आहें. मित्रा, आझं ऐक नि तुझ्या हातून घडणाऱ्या या अधःपातापासून परावृत्त हो. स्वतःला राजा म्हणवतोस नि तुझ्या हातून हें बेशरम दुष्कर्म ? राजा कशासाठीं असतो ? अबलांच्या संरक्षणासाठीं कीं त्यांचं अपहरण करण्यासाठीं ? तूं या पापकर्मापासून या क्षणींच परावृत्त झाला नाहींस तर तुझीं शंभर वर्षें भरलींच समज. सीतेच्या नुसत्या दृष्टिक्षेपानेंहि तुझं भस्म होऊन जाईल. अतिविषारी नागाला कवटाळण्याचा तुझा हा प्रयत्न आहे. यमाचा फांस तुझ्या गळ्याभोंवतीं घट्ट आवळत चालला आहे नि त्यामुळेंच स्वतःच्या विनाशाच्या वाटेनें तूं चालूं लागला आहेस.

“ मी आतां वयोवृद्ध झालों आहें. माझ्या हातीं या क्षणीं कांहीं शस्त्रहि नाहीं. याच्या उलट तूं अजून तरणाबांड आहेस. रथारूढ झालेला आहेस. शस्त्रसज्ज आहेस पण असं असलं तरी हा अत्याचार उघड्या डोळ्यांनीं पाहात राहाण्याएवढा मी नपुंसक नाहीं. हें भ्याड कृत्य नि तेंहि रामाच्या पश्चात तूं कशासाठीं करीत आहेस. त्याच्याविरुद्ध तुझ्या मनांत कांहीं शल्य असेल तर समोरासमोर जाऊन युद्ध कर किं ! काय वाटतं ?’ आपला रथ उडवीत आपण सहज जाऊं शकूं ? नाहीं ... माझे प्राण या कुडींत आहेत तोंवर एक पाऊलहि मी तुला पुढें सरकूं देणार नाहीं. तुझ्या रथाची, तुझ्या दहा तोंडांची, तुझ्या शस्त्रांची सुद्धां भीति मला वाटत नाहीं. जी भूमि तुझ्या अस्तित्वामुळें कलंकित झाली आहे, त्याच भूमीवर तुझी दहा शिरं घरंगळत पडल्याशिवाय राहाणार नाहींत. तूं भ्याड नसशील, नि माझ्याशीं लढण्याचं सामर्थ्य आपल्यांत आहे असं तुला वाटत असेल, तर ये रथांतून खालीं नि कर माझ्याशीं दोन हात !”

हें ऐकतांच रावणानें जटायूवर झेप घातली. तेथें तुंबळ युद्ध माजलें. जटायु पंख असलेल्या पर्वतासारखा लढत होता.

रावण त्याच्यावर एकापेक्षां एक भयंकर अशीं अस्त्रें सोडीत होता. पण जटायु आपल्या पंजांनीं त्यांची योग्य ती वासलात लावीत होता. त्यानें रावणावर चाल

करून त्याच्या शरीराचा एक भलामोठा लचका तोडला. त्यामुळें अतिशय संतापून जाऊन रावणानें अति भयंकर अशीं सर्पास्त्रें जटायूवर सोडण्यास प्रारंभ केला.

जटायु जखमी झाला होता, पण अजूनही तो प्राणपणानें लढत होता. सीता हें युद्ध अधीर होऊन पाहात होती. तिचें हृदय धडधडत होतें नि डोळ्यांवाटे अश्रु वाहात होते. तिला पहातांच जटायु पुन्हा उसळी मारून उठला. वयोमानापुढें आता त्याचें कांहीं चालत नव्हतें. अखेरचा प्रयत्न करून पाहावा म्हणून त्यानें होतें नव्हते तेवढें बळ एकवटलें नि आपल्याला झालेल्या जखमांची पर्वा न करतां तो पुन्हां रावणाच्या अंगावर धावून गेला. पंखांची झडप घालून त्यानें रावणाचा मुकुट नि धनुष्य दूर भिरकावून दिलें. रथाला जोडलेल्या घोड्यांचा नि सारथ्याचा त्यानें वध केला नि सबंध रथही पार खिळखिळा करून टाकला. रावण भुईवर कोसळला, पण अजूनहि तो सीतेला सोडायला तयार नव्हता. रावणाला पडतांना पाहून पंचमहाभूतांना मनस्वी आनंद झाला.

पुन्हा जटायूने रावणावर झेंप घेतली नि त्याच्या पाठीचे लचके काढले. रावणानें सीतेला घट्ट धरून ठेविलें होतें. त्याचे हात तोडावयाचा जटायू विचार करीत होता, पण रावणाला वीस हात होते. एक तोडावा तर दुसऱ्या हातानें तो सीतेला घट्ट धरून ठेवी.

अखेर रावणाचाहि नाइलाज झाला. त्यानें सीतेला सोडलें नि म्यानांतून खड्ग बाहेर काढून त्यानें जटायूच्या पंखांवर नि पंजांवर प्रहार केले. जटायु आतां अगदी असहाय झाला होता. तसाच तो भुईवर कोसळला. त्याला हालतांहि येत नव्हतें.

सीता धावत धावत त्याच्यापाशीं आली नि त्याला आलिंगन देत म्हणाली, "तूं मला पित्याच्या जागीं आहेस. माझ्यासाठीं तू आपला प्राण दिला आहे."

मग रावण तिच्या दिशेनें वळला. त्याच्या भीतीनें ती सैरावैरा पळूं लागली. झाडांना घट्ट कवटाळून धरीत ती आक्रोश करूं लागली, "रामा, कुठें आहेस रे तूं ! लक्ष्मणा, कुठें आहेस रे तूं ? तुम्ही कुणीच माझ्यासाठीं धावून येणार नाहीं का ?"

अखेर रावणानें तिला घेऊन त्यानें आकाशांत उड्डाण केलें.


काळ्याकभिन्न मेघाच्या वक्षावर वीज सळसळत असावी, तसें ते दृश्य दिसत होतें. वणव्याच्या आगीनें वेढलेला पर्वत दिसावा तसा रावण दिसत होता. सीतेच्या तेजानें धवळून निघालेला रावणाचा देह आकाशांतून अवतरलेल्या भयसूचक धूमकेतूसारखा दिसत होता.

अशा प्रकारें रावणानें सीतेचें अपहरण केलें. एव्हांना सूर्य अस्तास गेला होता आणि अकस्मात् पसरलेल्या अंधारांत पृथ्वी बुडत चालली होती.

सकळीकडे एकच शोक चालला होता, "धर्माचा ऱ्हास झाला, धर्म लयास गेला. सद्गुणांना नि करुणेला कवडीचीहि किंमत उरली नाहीं."

मुकी जनावरे आकाशाकडे पाहून नुसतीं अश्रु ढाळीत होतीं.

सीतेला घेऊन रावणाने जणू कांहीं आपल्याच विनाशाच्या दिशेनें उड्डाण केले होते. सीतेने डोक्यांत माळलेल्या फुलांच्या पाकळ्या वाटेंत गळून पडल्या होत्या. जणू कांहीं रावणाच्या दैवाची व वैभवाचीच अंतिम उधळण चालली होती.



# विचार—मंथन

—संत विनोबा

४१३. ज्ञानाची ज्ञानगम्यता म्हणजे पूर्व जन्माची सिद्धि, म्हणजेच आत्म्याची अमरता.

४१४. आसक्तांच्या आसक्तीनें आत्म्याच्या अमरत्वाची सिद्धि होणार नाहीं. कारण, आसक्ति भ्रमजन्य आहे. विरक्तांची अनासक्ति हा आत्म्याच्या अमरत्वाचा वास्तविक पुरावा आहे.

४१५. कधीं सत्यार्थ हिंसा आणि कधीं अहिंसार्थ असत्य मिळून दोन्ही उडव-ण्याचा तार्किकांचा धंदा आहे.

४१६. अहिंसादि असून आत्मज्ञानाचा उदय झालेला नाहीं, असें मी मानू शकतों. पण आत्मज्ञानोदय झालेला असून अहिंसादि नाहींत, असें मानणें मला जड जातें.

४१७. गृहाभिमान गेला म्हणजे गृहबंधन सुटतें. त्यासाठीं घर सोडावें किंवा पडावें लागत नाहीं. तसेंच देहाभिमान गेला म्हणजे देहबंधन सुटलें पाहिजे; त्यासाठीं देह सोडण्याची किंवा पडण्याची आवश्यकता असण्याचें कारण नाहीं.

——

# भक्त असावा तर असा

शंभर योजनांच्या अंतरावर असलेल्या लंकापुरींत सीतामाईला ठेवण्यांत आलें आहे, हें वृत्त संपातीकडून वानरांना कळलें. पण कितीहि झाले तरी दुसऱ्याकडून कळलेली ही वार्ता, ती खरी कीं खोटी हें प्रत्यक्षपणें पारखून पाहिल्याखेरीज सुग्रीवाकडे जाण्यांत काय अर्थ? आधींच ठरलेल्या वेळेपेक्षां उशीर झाला होता. असें असतांना परत जायचें म्हणजे रिकाम्या हातांनीं जाऊन थोडेंच भागणार होतें! संपातीनें वर्णन केलेली राक्षसनगरी स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय परतायला वानरसेना कबूल नव्हती. तसें केल्याशिवाय रामाचें काम होणार कसें?

सगळें खरें, पण हा मधला महासागर कसा काय ओलांडायचा?

पुन्हा सगळे जण विवंचनेंत पडले. "हा समुद्र ओलांडून लंकेंत जायचं, सीतेची भेट घ्यायची नि परत यायचं, कसं काय करायचं हें सगळं?"

भयानें व चिंतेनें त्यांना ग्रासलें.

अंगद म्हणाला, "हें काम कितीहि दुर्घट असलं तरी आपण धीर सोडायचा नाहीं. धीर तर यशाची गुरुकिल्ली! धीर सुटला कीं सगळंच संपलं."

मग त्यानें प्रत्येक वानरला तो अधिकाधिक किती लांब उडी मारूं शकतो तें विचारून घेतलें. तो म्हणाला,

"माझ्या सैनिकांनो, सुग्रीवाकडून तुमच्या सामर्थ्याची अनेक वेळां मीं स्तुति ऐकली आहे. तुमच्या बाहुबलाबद्दल किंवा चातुर्याबद्दल माझ्याहि मनांत कांहीं शंका नाहीं. आकाश कोसळलं तरी हें कार्य आपण पूर्ण केलंच पाहिजे. सीतेची भेट घेतल्याखेरीज किष्किंधेला परत जाण्याची गोष्टच नको. सुग्रीवाच्या हातून कलंकित मृत्यु येण्यापेक्षां, आपण हातीं घेतलेलं हे काम पुरं करतांना आपल्याला मरण पत्करावं लागलं तर तें अधिक बरं! तेव्हां आतां तुमच्यापैकीं प्रत्येकजण अधिकाधिक किती लांब उडी मारूं शकतो, तें सांगा बरं!"

गज विनम्रपणें म्हणाला, "मी दहा योजनं लांब उडी मारूं शकतों." गवाक्ष म्हणाला, "मी वीस." आणखी एक वानरनेता म्हणाला, "एका उडींत तीस योजनं मी सहज पार करीन."

अशी त्यांच्यांत अहमहमिका लागली होती. सर्वांत शेवटीं वृद्ध जांबवान म्हणाला "मी आतां गलितगात्र झालों आहें. पण राजाच्या शब्दासाठीं मी अजूनही वाटेल तें करायला तयार आहें. असं असलं तरी नुसत्या निष्ठेनें काय होणार आहे? मी एका उडींत नव्वद योजनं घेऊं शकेन असा आत्मविश्वास अजूनहि मला आहे. पण तेवढ्यानें हा महासागर ओलांडतां येणार आहे थोडाच? खरंच, आज मी तरुण असायला हवं होतं."

यावर अंगद म्हणाला, "तशीं मी शंभर योजन एका उडींत पण मारीन लंकेहून परत यायला माझ्यांत कांहीं त्राण उरणार नाहीं."

त्याची समजूत काढण्यासाठीं म्हणून जांबवान म्हणाला, "राजन्, आपल्या सामर्थ्याविषयीं कांहीं शंका तुझ्या मनांत असायचं कारण नाहीं. वालीइतकंच सामर्थ्य तुझ्यांत निश्चितपणें आहे. पण तुझ्या आज्ञेचं पालन करणारे एवढे सैनिक इथें असतांना तूं स्वतः लंकेला जावयास निघावंस अशी आवश्यकता नाहीं. राजानें असं प्राणपणानें वागणं हे सुरक्षितपणाचं तर नाहींच, पण त्यांत मुत्सद्देगिरीहि नाहीं."

हनुमान हें सारें ऐकत निमूट उभा होता. त्याच्यकडे एक कौतुकाचा कटाक्ष टाकून जांबवान म्हणाला, "हे काम हनुमानाखेरीज दुसरं कुणी करूं शकेल असं मला वाटत नाहीं."

मग जांबवाननें त्याला हातीं धरून घोळक्याच्या मधोमध आणून उभें केलें आणि त्याला उद्देशून तो म्हणाला, "हनुमान, तूं एवढा ज्ञानी नि या क्षणीं असा गप्प कां? तुझ्या सामर्थ्याची बरोबरी करणारा सुग्रीवशिवाय कुणी नाहीं, हें तूं मनोमन जाणतोसच. आम्ही सारे तुझ्या पासंगालाहि पुरणार नाहीं. राम—लक्ष्मणांचं सामर्थ्य तुझ्या बाहुबलांत आहे. महासागरावरून उड्डाण करतांना गरुडाला मीं पाहिलं आहे. त्याच्याएवढी शक्ति तुझ्यांत नक्कीच आहे. फरक एवढाच आहे, कीं आपल्या कुशाग्र बुद्धीची नि अजोड सामर्थ्याची जाणीव तुझ्यांत नाहीं. उभ्या अवनीतलावर तुझी बरोबरी करणारा शोधूनहि सांपडणार नाहीं. तुझी माता अंजना ही स्वर्लोकीची देवता. ऋषिशापामुळें तिला वानरीचा जन्म घ्यावा लागला. एकदा ती एका टेकडीवर सहलीला गेली असतांना वायूनें तिला पाहिलं. तिचं लावण्य पाहून तो भाळला नि त्या धुंदीतच त्यानें तिला आलिंगन दिलं. हा अनपेक्षितपणें घडलेला प्रकार पाहून अंजना संतापानें चळचळां कांपूं लागली. 'दुष्टा, कोण आहेस तूं? माझा असा विनयभंग तुला करवला तरी कसा?' वायु म्हणाला, 'थांब, अशी रागावूं नकोस. मी तुझ्या देहाला स्पर्शहि केलेला नाहीं नि तुझ्या कौमार्याचाहि भंग माझ्याकडून झालेला नाहीं. मी तुला आलिंगन दिलं तें शरीरानें नव्हे, हृदयानें. आपल्या या दैवी समागमापासून जें पुत्ररत्न जन्मास येईल तें सामर्थ्याच्या बाबतींत माझी बरोबरी करणारं असंच

असेल. वानरकुळांत त्याच्याएवढा सामर्थ्यवान् किंवा बुद्धिमान् आजवर कुणी झालेला नाहीं.'

"हनुमाना, तूं लहान होतास तेव्हांची गोष्ट. आकाशांत झळाळणारें सूर्यबिंब पाहिल्यावर तुला वाटलं तें एखादं फळच आहे. तशीच तूं त्याच्या दिशेनें भरारी घेतलीस. तुला उड्डाण करीत येतांना पाहिल्यावर इंद्राला सूर्याची मोठी काळजी पडली. आतां कांहीं केल्या हा सूर्यबिंबाचा लचका तोडल्याशिवाय राहात नाहीं, अशी भीति त्याला वाटूं लागली. त्यानें तुझ्यावर वज्र सोडलं. त्याच्या प्रहाराबरोबर निपचित होऊन तूं एका पर्वतावर पडलास. तुझा उजवा जबडा जायबंदी झाला होता. हा प्रकार पाहून तुझ्या पित्याचा क्रोध अनावर झाला नि तो वाहायचाच थांबला. वारा वाहात नसल्यामुळें सर्व प्राणिमात्रांना जगणं अशक्य होऊन बसलं. ही परिस्थिति निर्माण झालेली पाहातांच देवांना दुसरं गत्यंतर उरलं नाहीं. त्यांनी कशीबशी वायूची समजूत काढली नि तुझ्यावर आशीर्वादांची वृष्टि केली. ब्रह्मदेवानें नि इंद्रानें तुला वर दिले. कोणतेंहि शस्त्र तुझे प्राण हरण करूं शकणार नाहीं. तूं इच्छामरणी आहेस, अमर आहेस. हे अंजनानंदना, बुद्धी आणि शक्ति यांच्या बाबतींत तूं नि वायुदेव सारखेच आहांत.

"पण असं असूनहि तूं गुणसंपन्न नि विनम्र आहेस. तूं एकटाच या क्षणीं आमच्यासाठीं कांहीं तरी करूं शकशील. तुझ्या साहाय्याविना आमच्या हातून रामाचं कार्य होईलसं दिसत नाहीं. हा असला महासागर ओलांडून जाणं हा तर तुझ्या हातचा मळ आहे. दुःखाच्या महासागरांत गटांगळ्या खात पडलेल्या या वानरसेनेची मुक्तता करणं हें आतां सर्वस्वीं तुझ्या हातीं आहे. आपल्या सामर्थ्याचा या वेळीं तूं योग्य उपयोग करशील अशी आशा आहे.

"एके काळीं मीहि तुझ्यासारखा तरुण होतों, तेव्हां चोवीस वेळां हें जग मी पालथं घातलं आहे. अमृतमंथनाच्या वेळीं देवांच्या आदेशावरून चारी दिशांना मुसंडी मारून औषधी आणल्या त्या मींच. पण आतां माझ्यानें एवढं साहस होणार नाहीं. आतां तूंच आमचं एकमेव आशास्थान.

"हे वीरपुरुषा, पुन्हा पुन्हा मी तुझी विनवणी करतों. आतां अधिक विलंब लावण्यांत अर्थ नाहीं. आपल्या सामर्थ्याची योग्य जाणीव मनांत ठेवून, त्रिविक्रमासारखा एका उड्डाणांत समुद्र पार करून जा आणि आलेल्या संकटांतून आमची सुटका कर.

एकाएकीं हनुमानाचा देह आकाशाच्या दिशेनें वाढूं लागला. त्या विराट, तेजःपुंज देहावर दृष्टी खिळणें अशक्य होऊन बसलें होतें.

येथून पुढें रामायणाचा खरा नायक होतो तो हनुमानच. विष्णुभक्त त्याला प्रेमळपणें 'हरिदास' म्हणतात. हनुमान हा विष्णूचा धाकटा दास. थोरली पाती जाते गरुडाकडे. तिन्ही त्रिकाळ जातीनें तो विष्णूच्या सेवेंत असतो ना.

या धाकट्या विष्णुदासानें सीतेचें दुःख दूर करून लंकादहन कसें केलें आणि रामाकडे येऊन 'सांपडली सीता' हें कसें सांगितलें, हाच कथाभाग येथून पुढें सांगायचा.

हनुमानच्या अफाट सामर्थ्याची जाणीव जांबवानानें त्याला करून दिली होती. याच जाणिवेचा आधार घेऊन तो रामाच्या कामासाठीं निघाला. निघतां निघतां जांबवानाकडे वळून तो म्हणाला, "आपल्या मुखांतून निघालेले शब्द खरे होतील. इथून एकाच उड्डाणांत मी लंका गांठीन नि तिथे जाऊन सीतामाईंचं दर्शण घेईन हे निःसंशय. परत येऊन ही सुवार्ता मी तुमच्या कानीं घातल्याशिवाय राहाणार नाहीं. हा पाहा उड्डाणासाठीं पाय रोवला मीं जमिनींत. देव करो नि महेंद्र पर्वताला माझ्या सामर्थ्याचा भार पेलतां येवो."

महेंद्र पर्वतावर येऊन त्यानें आपलें सारें बळ पायांत आणलें व उड्डाणापूर्वीचा पवित्रा घेतला. पर्वतावर राहाणाऱ्या प्राणिमात्रांना त्याच्या सामर्थ्याचा भार सोसेनासा झाला व ते पटापट तेथून बाहेर पडले.

पर्वताच्या माथ्यावरून हनुमानानें एकदां समुद्राच्या दिशेनें दृष्टिक्षेप केला व योग्यस्थ मनानें त्यानें लंकानगरीचें चिंतन केलें. 'मी सीतेचा शोध काढल्याशिवाय परतणार नाहीं. उड्डाण करून मी हा महासागर लीलया पार करीन,' हा एकच घोष त्याच्या मनांत घुमत होता.

मग त्यानें सूर्य, इंद्र, वायु, ब्रह्मा, प्रभृति देवादिकांचें ध्यान केलें, पूर्वेकडे तोंड करून त्यानें आपला पिता वायु याला अर्घ्यदान केलें आणि आपलें अंग आणखी फुगवून त्यानें दक्षिणेच्या दिशेनें मुसंडी मारली.

त्या मुसंडीच्या आघातानें पर्वतावरचे सारे वृक्ष बुंधापासून खळखळले आणि जिकडे तिकडे फुलांचा सडा पडला. हनुमानाच्या पायांखालची जमीन खोलवर चेपली जाऊन ठिकठिकाणी निर्झरणीचें पाणी वाहूं लागलें. हत्तीच्या गंडस्थळावरून मद ओघळावा तसे त्याचे पाट दिसूं लागले. खडकांखडकांतून अनेकविध रंगांचा धातुरस ठिबकूं लागला. बावरलेलीं जनावरें गुहांगुहांतून बाहेर पडून सैरावैरा पळूं लागलीं. फणा उभारलेले नाग खडकावर आपल्या फणा मारूं लागले आणि त्या आघातानें त्या खडकांतून ठिणग्या उडूं लागल्या.

हनुमानाच्या अंगावरचा केसन् केस ताठ उभा राहिला. त्यानें एक गगनभेदी आरोळी ठोकली आणि आपलें शेपूट जोरानें जमिनीवर आपटलें. श्वास रोधून त्यानें पावलें मातींत घट्ट रोवलीं. कान टवकारले. स्नायूस्नायूंत प्राण भरला व पुन्हा एकदां त्रिभुवनाचा थरकांप करणारी एक गर्जना करून तो आकाशाच्या दिशेनें उंच उंच उडूं लागला. गरुडाची गति, रामबाणाची झेंप, त्याच्या उड्डाणाच्या गतीमुळें वारे इतक्या जोरानें वाहूं लागले, कीं कित्येक वृक्ष पाहातां पाहातां उन्मळून पडले, इतकेंच नव्हे

तर त्या आवर्तांच्या भाराखालीं ते योजनेंच्या योजनें उडत गेले आणि इंद्रानें पंख तोडून टाकल्यामुळें एकेक पर्वत कोसळून पडावा तसे समुद्रांत जाऊन पडले. एखाद्या लग्निमित्रासारखे ते जणूं मारुतीला निरोप देण्यासाठीं म्हणून सात पावलें त्याच्यासमवेत गेले होते. त्यांच्या फुलांनीं भरून गेलेला समुद्राचा पृष्ठभाग चांदण्यांनीं मोहोरलेल्या आकाशासारखा दिसूं लागला. मारुती वारा कांपीत चालला होता, तेव्हां त्याचे हात दोन पंचफणी नागांसारखे भासत होते. उडतांना तो जणूं आकाशच गिळीत असल्यासारखा भासला. त्याच्या नजरेंत जसा काय वणवा लागला होता. त्याचें लाल नाक अस्तमानच्या सूर्यबिंबासारखें दिसत होतें. एखाद्या प्रचंड धूमकेतूसारखा तो आकाश भेदीत निघाला होता. त्याच्या उड्डाणांतून उठलेला वारा कर्कश शीळ घालीत होता. समुद्राच्या पाण्यावर पडलेली त्याची विराट सांवली नौकेसारखी दिसत होती. पंख फुटलेला एक अक्राळविक्राळ पर्वत आकाशांतून चालला आहे, असें वाटत होतें. म्हणूनच एखादा ढग येई नि मारुती क्षणभर दिसेनासा होई, तेव्हां पौर्णिमेच्या चंद्रबिंबाची आठवण येई. गंधर्व त्याच्यावर पुष्पवृष्टि करीत होते; देवर्षींच्या आशीर्वादांच्या घोषानें त्रिभुवनें दुमदुमून निघालीं होतीं.

वाटेंत आलेलीं सर्व संकटें त्यानें नेहमींचेंच चातुर्य, धैर्य आणि दूरदृष्टि दाखवून सहजपणें पार केलीं. एक प्रचंड पर्वत अकस्मात् वर आला व मारुतीच्या वाटेंत उभा राहिला. मारुतीनें आपल्या छाताडानें त्या मैनाक पर्वताला एक धडक दिल्याबरोबर मात्र तो सुतासारखा सरळ आला व त्यानें त्याला वाट करून दिली.

हनुमानाला उद्देशून तो शरण आलेला पर्वत म्हणाला, " माझें नांव मैनाक. सगर कुलांतील रामाच्या साहाय्याला धावून जाण्यासाठीं समुद्रदेवानें मला आज्ञा केली आहे. सगरकुलाचा नि समुद्रदेवाचा स्नेह प्राचीन कालापासूनचा आहे. हा स्नेहसंबंध लक्षांत घेऊन तूं क्षणभर तरी माझ्या शिखरावर बसून विसांवा घ्यावास, अशी माझी इच्छा आहे. रामाचें काम तुझ्या हातूनच पुरें होणार आहे. इंद्र वज्र घेऊन आम्हां सर्व पर्वतांच्या मागें लागला होता, तेव्हां मी समुद्रनगरींत आश्रय घेतल्यामुळें वांचलों होतों. समुद्रदेवांच्याच आज्ञेवरून मी तुला होईल तेवढें साहाय्य करण्यासाठीं आलों आहें. सगरपुत्रांनीं भूमि खणली नसती तर सागरांची खोली वाढली नसती. तुझा पिता वायुदेव माझ्या मदतीला आला नसता तर इंद्राच्या वज्राच्या तडाख्यांतू माझी सुटकाहि झाली नसती. माझ्या आदरातिथ्याचा तूं स्वीकार करशील नि क्षणभर इथें विश्रांति घेशील तर या दोघांनाहि परम आनंद झाल्याशिवाय राहाणार नाहीं. "

पण हनुमानाला एवढा वेळच कुठें होता ? त्या पर्वतश्रेष्ठाच्या विनंतीस मान देणें त्याला केवळ अशक्य होतें. आपली ही असमर्थता अतिशय विनम्रपणे व्यक्त करीत तो म्हणाला, " मित्रा, फुकट दवडण्यासारखा एक क्षणहि या वेळीं माझ्यापाशीं

नाहीं. रामाचं काम पुरं करायचीं शपथ घेऊन मी निघालो आहे. ते काम केल्याशिवाय मी विसांवा तरी कसा घेऊं ? तूं एवढं अगत्य दाखवलंस त्यांतच मला समाधान आहे."

प्रेमभराने पर्वतराजाच्या अंगावरून हात फिरवून तो पुन्हा उड्डाण करूं लागला.

तो जरा पुढें जातो न जातों तोंच एक विचित्र आकृति आ वासून त्याच्या वाटेंत आली. "मी अनेक दिवसांचा भुकेला आहे. बरं झालं अगदी वेळेवर इथें येऊन ठेपलास. आता मुकाट्याने माझ्या तोंडात प्रवेश कर." एखाद्या प्रचंड गुहेसारखा आपला जबडा त्या राक्षसाने उघडला नि हनुमानाची वाट धरून तो उभा राहिला.

हनुमानानें त्याला धुडकावून लावले. "मी निघालोंय रामाच्या कामाला. विनाकारण माझी वाट अडवू नकोस." त्यानें त्या राक्षसाला समज दिली.

पण तो राक्षसहि तितकाच हट्टाला पेटलेला होता. तो गरजला, "ते कांहीं नाहीं. मुकाट्याने माझ्या मुखांत प्रवेश कर."

हनुमानाला तेवढ्यांत एक युक्ति सुचली. तो देहानें भराभर वाढूं लागला. त्याला वाटले होतें, कीं या राक्षसाच्या तोंडापेक्षां आपण आपलें अंग मोठे केले कीं झालें पण आश्चर्याची गोष्ट अशी, की तो वाढत होता, त्याचबरोबर त्या राक्षसाचे तोंडहि मोठें मोठें होत होतें. तो राक्षस म्हणजे दुसरें तिसरें कोणी नसून नागकन्या सुरसेनें घेतलेले तें मायावी रूप होतें.

राक्षसाचा जबडा एवढा प्रचंड उघडलेला पाहातांच हनुमान तिळा एवढा लहान झाला व त्या आक्राळविक्राळ मुखांतून सहजपणें तीनचार फेऱ्या घालून तो पुन्हा बाहेर आला आणि पूर्वीसारखा होऊन हसत हसत त्याला म्हणाला, "तुझी इच्छा पुरी केली आहे. तुझ्या मुखांत प्रवेश केला आहे. आतां आणखी काय हवं तुला ?"

नागकन्या त्याला आशिर्वाद देत म्हणाली, तूं ज्या कामासाठी निघाला आहेस त्यांत तूं पूर्णपणे यशस्वी होईल. तुझी परीक्षा घेण्यासाठींच देवांनी मला येथे पाठवलं होतं. आतां रामाचं काम तुझ्या हातून झाल्याशिवाय राहात नाहीं."

पण हे कांहीं शेवटचेंच संकट नव्हतें.

उड्डाण करीत हनुमान पुढें निघाला तेव्हां अकस्मात् आपली गति कमी कमी होत चालली आहे असे त्याला आढळून आलें. तसे व्हायचे, खरे म्हणजे, कांहीं कारण नव्हते. कुठली तरी एक अज्ञात शक्ति आपले पाय खाली खाली ओढीत आहे. असे त्याला वाटत होते.

चारी दिशाना त्याने नजर टाकली आणि मग हें असें कां होते याचे कारण त्याच्या लक्षांत आले, त्याची समुद्राच्या पाण्यावर पडलेली सावली एक राक्षसीण मागे तशीच खाली ओढण्याचा प्रयत्न करीत होती आणि त्यामुळेच त्याच्या उड्डाणाच्या गतींत प्रतिबंध निर्माण होत होता.

हनुमानाची सावली ओढणारी ती राक्षसीण पुटपुटत होती, "फार दिवसांची भुकेली आहे मी. किती तरी काळ लोटला. मी वाट पाहात बसलेली आहे. भुकेने मी व्याकुल झालेली आहे." मघांच्या राक्षसासारखीच तीहि आपला प्रचंड जबडा उघडून, खाली खाली येत चाललेल्या हनुमानाच्यां आकृतीकडे आशाळ भूतपणे पाहात होती.

डोळ्याचे पाते लवते न लवते तोंच हनुमानाने सूं सूं करीत तिच्या मुखात प्रवेश केला व तिचे शरीर भेदून तो उदरांतून बाहेर पडला. राक्षसिणीचे ते प्रचंड धूड धाडदिशीं समुद्रात कोसळले. ग्रहणांतून मुक्त झालेल्या चंद्रबिंबासारखा झळाळत हनुमान पुढे निघाला.

अशी नाना तऱ्हेची संकटे बुद्धिचातुर्याने, साहसाने व सामर्थ्याने निवारित अखेर तो लंकेच्या किनाऱ्यापाशीं येऊन ठाकला. केळीच्या झाडानी नि माडांनीं तो किनारा नुसता भरून निघाला होता,

त्या बेटावरील पर्वत, बागबगीचे, अरण्ये, नद्यांची मुखे हनुमानाला वरून दिसत होती.

रावणाच्या साम्राज्याचे वैभव व लंकेचे सौन्दर्य पाहून हनुमान क्षणभर हरखून गेला.

आपण कोण आहोंत याची राक्षसांना चाहूल लागू न देतां आतां सीतामाईचा शोध करायला लागले पाहिजे, असा विचार करून त्याने आपला देह सामान्य वानराएवढा केला आणि लंकेच्या एका डोंगरमाथ्यावर तो उतरला.

———

# महंमद पैगंबरांच्या कथा

## पैगंबर आणि चमत्कार

मुसलमानी धर्माचे संस्थापक महंमद पैगंबर साहेब निरक्षर होते. त्यांना अजीबात लिहितां वाचतां येत नव्हते. एकदां पैगंबर साहेबांना कांहीं विद्वानांनीं विचारलें, "पैगंबरा ! तुमच्यापूर्वी जितके पैगंबर होऊन गेले त्यांनीं चमत्कार करून दाखविले. पण तुम्ही तर कोणताच चमत्कार करून दाखवीत नाहीं ! तुम्ही करा चमत्कार कीं आम्ही घातलाच नमस्कार ! पण तुम्ही पैगंबर झालात तरी कसे ?"

पैगंबरांनीं उत्तर दिलें—"तुम्हाला कोणता चमत्कार पाहिजे ? एक लहानसें रोपटें लावलें असतां त्याचा महान वृक्ष होतो, त्याला सुंदर फुलें लागतात, फळें येतात ! हा कां चमत्कार नाही ?"

असें एक साधें उत्तर त्यांनीं दिलें. दुसरें उत्तर त्यांनीं दिलें—"माझ्यासारखा अडाणी माणूस तुम्हाला ज्ञान देऊं शकतो, हा काय लहान चमत्कार आहे ? तुम्हाला आणखी कोणता चमत्कार हवा ?"

आमच्या समोरील सृष्टि ज्ञानानें परिपूर्ण आहे. आम्ही त्याचें खरेंखुरें मर्म जाणून घेत नाहीं, म्हणून जो आनंद भरलेला आहे तो आम्हाला मिळत नाहीं. आम्ही चमत्काराच्या मागें लागून खरा धर्म विसरत असतो.

## 'आम्ही दोघे नाहीं, तीघे आहोंत'

पैगंबर महंमद सर्वांवर प्रेम करीत, सर्वांना समानतेनें वागवीत. परंतु त्यांचे विचार न पटल्यानें कांहीं लोक त्यांचा विरोध करीत, त्यांना पाण्यांत पहात. पैगंबर साहेबांच्या जिवाला त्यामुळें धोका निर्माण झाला होता.

अशाच एका प्रसंगीं आपल्या एका सोबत्यासह ते जंगलांतून पळून जात होते. मागून पाठलाग करीत फौज येत होती. महंमदांना त्या शिपायांच्याबद्दल जराहि वैर नव्हतें. परंतु त्या फौजेला ? ती तर मागें लागून त्यांचा पाठपुरावा करीत होती.

स्थिति कठिण आहे हें ओळखून पैगंबरांनीं जीव वांचवण्याच्या दृष्टीनें वनांतील एका खड्डयाचा आश्रय घेतला. ते दोघे हि त्या खड्डयांत जाऊन लपून बसले. बरोबरचा सहकारी घाबरला होता. तो म्हणूं लागला—"आतां आपली धडगत नाहीं दिसत ! फौज तर आपल्यामागें हात धुऊन लागलेली आहे आणि आपण आहोंत दोघेच !"

तेव्हां पैगंबर म्हणाले, " आम्ही दोघेच आहोंत अशा भ्रमांत नको राहूं. तुला भान नाहीं. आपण दोघे नाहीं, तिघे आहोत. आणि तो तिसरा शक्तिशाली आणि समर्थ आहे. तो दिसत नाही, लपलेला आहे. परंतु तो तिसरा आमचा सहकारी आहे, तेव्हां आपल्याला घाबरायचें कारण नाही."

हा जो अव्यक्तरूपानें आपल्याजवळ नेहमीं असणारा मित्र आहे, त्याची ओळख पटल्यावर न भीति वाटेल, न गर्व होईल.

## महंमदाचा अहिंसेचा प्रयोग

महंमद पैगंबरांनीं परमेश्वराच्या आधारावर आपल्या कार्याला सुरवात केली होती. आपल्या म्हणजे सत्याच्या. सत्य आपल्याला कळत असतें. जेवढें आकलन होत असतें तेवढें समोर असतें. उद्यां अधिक कळूं लागलें तर तेवढें परिवर्तन होत जातें. त्यासाठीं आपल्या जवळ साधन आहे सब्र. सब्र म्हणजे शांति.

महंमदांचे सहकारी त्यांच्या शिकवणीनुसार वागण्याचा प्रयत्न करीत असत. त्यामुळें समाजांत त्यांचा फार छळ झाला. कारण, त्या समाजासाठीं त्यांचा तो विचार नवीन होता–" सत्य एकच आहे. त्याची नाना प्रकारें उपासना होते हें चूक आहे." हा विचार समाजासाठीं नवीन होता. अनेक देवदेवतांच्या पूजा तेव्हां होत असत. ह्या नवविचारामुळें लोकांनीं त्यांना फार छळलें. त्रास देणाऱ्यांचें अहिंसेचें किंवा शांतीचें व्रत तर नव्हतें च. त्यामुळें ह्या अनुयायांचें फार हाल होत होते.

ही स्थिति पाहून महंमदसाहेब म्हणाले, " आम्ही स्थानांतर [ हिजरत ] करूं. यांना सोडूं. पृथ्वी विशाल आहे. या लोकांना सोडून आम्ही दुसरीकडे कुठें निघून जाऊं. इथें राहणार नाहीं."

हिजरत करण्यासाठीं पैगंबरसाहेब कांहीं सहकाऱ्यांना घेऊन दुसऱ्या ठिकाणीं गेलें. यावेळपर्यंतचें त्यांचें चिंतन पूर्ण अहिंसक होतें.

नव्या जागीं पण त्यांचा छळ होऊं लागला. सहकारी घाबरूं लागले. पैगंबरांनीं धीर दिला. सांगितलें कीं परमेश्वर आमच्या बरोबर आहे, परमेश्वरानें आपल्याला बुद्धी दिलेली आहे, शक्ति पण दिली आहे. ही सारी त्याचीच देणगी आहे. परंतु सहकाऱ्यांची भीति जाईना. हें पाहिल्यावर ते म्हणाले, " मग भिण्यापेक्षां अल्लाच्या नांवानें लढणें चांगलें."

पैगंबर साहेबांचे सहकारी मोजके होते. त्यामुळें युद्धांत त्यांच्या नशीबीं मार खाणेंच होतें. याचा अर्थ पुन्हा धीर धरण्याचाच प्रश्न होता. लढाईच्या बाबतींत पण पैगंबरांनीं सर्वांना सांगितलें–" लढतांना राग येता कामा नये. राग आलाच तर शस्त्र चालवूं नये."

———

# साक्षात्काराचे दोन मार्ग

लेखक : केशव कृष्ण प्रधान

वरील मथळ्याप्रमाणें साक्षात्काराचे दोन मार्ग अगदीं अलग आणि निरनिराळे आहेत. असें सर्व तत्वज्ञानांतून आणि विशेषतः भारतीय तत्वज्ञानांतून प्रतिपादीत केलेलें दिसतें. खरें पाहिलें असतां साक्षात्कार हा एकच असणार. म्हणजेच एकाच सत्याच्या स्वरूपाचा असणार. त्या सत्याकडे जाण्यास दोन अगदीं परस्पर विरुद्ध दिशेचे मार्ग कसे असूं शकतील ? अर्थात् असूं शकणारच नाहींत. तरी सकृतदर्शनीं जरी हे मार्ग केवळ प्रतिपादनासाठीं भिन्न म्हणून तत्वज्ञानांत दिलेले असले तरीही ते दोन्ही मार्ग एकाच दिशेनें एकमेकाला पोषक किंबहुना एकांत एक गुंफलेले, नव्हे समरस झालेले, असेच असले पाहिजेत, ह्याबद्दल शंका घेण्याचे कांहीं कारण नाहीं. वरील प्रश्नाचा जरूर तितका उहापोह खालील लेखांत करण्याचा प्रयत्न केला आहे.

## अष्टांग योगमार्ग

पातंजली योग–सूत्रांत ' योगः चित्तवृत्ति निरोधः ' अशी सुरवात करून आत्म-साक्षात्कारापर्यंत अष्टांग योगमार्ग दाखविला आहे. यम, नियम, आसन, प्रत्याहार, प्राणायाम, ध्यान, धारणा, समाधि. या आठ अंगांपैकीं पातंजली योग–सूत्रांत यम, नियम, आसन आणि प्रत्याहार या पहिल्या चार अंगांचें विशेष निर्देशन न करतां प्राणायाम, ध्यान, धारणा व समाधि या पुढील चार अंगांचा खोल विचार केला आहे. याच वाक्याला ब्रह्मवाक्यानुवृत्तिमध्यें हंसराज स्वामींनी साक्षीत्वाचा अभ्यास असे म्हटलेलें दिसतें.

## चित्तवृत्ति निरोध

' चित्तवृत्ति निरोध ' व ' चित्तवृत्ति अवलोकन ' यामध्यें फरक आहे. चितवृत्तीचा निरोध करणें म्हणजे चित्तवृत्ति अजिबात उठूनच न देणे व त्या तशा न उठाव्या म्हणून प्राणायाम, ध्यान, धारणा यांचा अवलंब करणें व चितवृत्ति उठत असताना एक वृत्ति उठून गेल्यावर, दुसरी वृत्ति उठायच्या पूर्वी, या दोन वृत्तींच्या मध्यें असलेल्या अवकाशाकडे–पोकळीकडे बघणे. या दोन्ही क्रिया एकमेकांपासून भिन्न आहेत. परन्तु या दोन्ही क्रियांचा उद्देश चितवृत्तिचा निरास झाल्यावर चित्तवृत्तीमागें असलेल्या केवळ संविदाशी अवलोकनाने एकरूप होण्याचा आहे. उद्देश एकच, बोचावयाचे

ठिकाण एकच, मार्ग मात्र अगदी भिन्न भिन्नच नव्हे तर एकमेका विरुद्ध, असे या क्रियेत दिसते. या भिन्नत्वाला काय कारण असावे की ज्यामुळें हे दोन्ही मार्ग वेगळे आहेत का, ह्या शंकाकुशंका मनामध्यें उत्पन्न होऊन त्यांचें निरसन कशा तऱ्हेनें होईल याचा विचार करण्यास भाग पडावे ? त्याचे उत्तर खालील तऱ्हेने मिळू शकेल असें वाटते.

## सर्वांना आकार आहे

जग हें आकारमय आहे. त्यातल्या वस्तू–वस्तूला आणि प्राणिमात्राला कांहींतरी आकार आहेच. दगड, धोंडे त्यांना देखील आकार आहेच. मानवांच्या आकारांतील भिन्नत्व तर विचारूंच नका. आकार, रंग, रूप, नाम, देश, काल या विविध भेदांमुळें या विश्वांत प्रचंड भिन्नता निर्माण झाली आहे. या प्रचंड भिन्नतेचे परिणाम मानवी मनांत हजारो भिन्न विचार निर्माण करण्यांत होते. या सर्व भिन्न भिन्न विचारांच्या स्मृति मानवी अंतःकरणांत दडून जरूर पडेल त्यावेळीं किंवा इतर वेळींसुद्धां वरखाली होत असतात व मानवी मनाला भिन्न भिन्न आंदोलनें देत असतात. या स्मृतिबरोबर त्या त्या आकाराच्या प्रथम दर्शनानें अगर पुन्हा–पुन्हा पाहिल्यानें निर्माण झालेले संस्कार मानवी मनांत प्रेम, असूया, राग, द्वेष वगैरे विचार निर्माण करून या विचारआंदोलनाला आणखीनच गति देत असतात. या सर्व विचारामुळें मानवी मनांत नाना तऱ्हेच्या वृत्ति सतत उठत असतात व नाहींशा होत असतात. या सर्व वृत्तींचा पातंजलींच्या म्हणण्याप्रमाणें निरोध करण्यासाठीं एकाग्रतेची जरूर आहे. मन एकाग्र करणें म्हणजे मनाला चित्तवृत्तींच्या निरासाच्या उद्दिष्ठाकडे बळजबरीनेंच लावणे नव्हे कां ? त्याविरुद्ध हंसराज स्वामींच्या म्हणण्याप्रमाणें वृत्ति उठत असतांना त्या वृत्तींच्या मधील पोकळींत बघणें. याचा अर्थ वृत्ति उठू न देणें, त्याचा निरोध न करणें, इतकेच नव्हे तर दोन वृत्ति एकामागून एक येऊन मगच त्या तयार झालेल्या अवकाशाकडे सहज तऱ्हेनें बघणें असा होतो. यालाच जे. कृष्णमूर्ति 'सेल्फ अवेअरनेस' म्हणतात. आणि हाच साक्षीत्वाचा अभ्यास असें सर्व पूर्णाचार्यांचें मत आहे. तेव्हां सर्व पूर्वाचार्य आणि पातंजली यांच्या मतात सकृतदर्शनी परस्पर विरुद्ध असा भेद दिसून येतो. प्रश्न एवढाच आहे कीं हा भेद खरोखर केवळ सकृतदर्शनी आहे किंवा काय ?

## सर्व वृत्तींचा निरोध

चित्तवृत्ति उठाव साकार, सापेक्ष आहे. एवढेच नव्हे तर त्यांत रंग, रूप, नाम, देश, काल या सर्व भिन्नता अपेक्षिल्या आहेत. म्हणजे थोडक्यांत सर्व विश्वाच्या आकारमय रचनांचें प्रतिबिंब मानवाच्या विचारांत व वृत्तींत आहे. हें सर्व जग माया

म्हणून तर या सर्व वृत्तींचा निरोध करावयास पाहिजे. मग तो बळजबरीनें असो किंवा दोन वृत्तींच्या मधल्या अवकाशाकडे बघण्यानें असो. भगवान पातंजली यांस सर्व पूर्वाचार्यांच्याप्रमाणेंच मानवांत वृत्ति निरास साधावयाचा होता व उद्दिष्टापुरते दोघांच्यामध्यें पूर्ण साम्य आहे. मानवी वृत्ति–निरासामागे निराकार, निर्गुण नामरूप, रंग, काल, देशविरहीत निर्विशेष असे सत्य आहे. वृत्ति–निरास करण्यासाठीं या दोन मतप्रणालीत फरक नाहीं. मार्ग अवलंब कोणते करावे ? एवढाच प्रश्न शिल्लक राहतो.

## परमेश्वरनिर्मित विश्वरचना

हा विचार करतांना सर्वभूतांतरी वास करीत असलेला हा निर्विशेष परमात्मा प्रत्येक प्राणिमात्रामध्यें आकार, रंग, नाम, रूप घेऊन विशेषत्वानें आविष्कृत होतो. म्हणजे प्राणिमात्रांच्या दरएक गुणात किंवा वैशिष्ठ्यात हा परमेश्वर सत्यार्थानें असतो किंवा नसून भासमान होतो याचा विचार योग्य तऱ्हेनें झाल्यावरच वरील दोन मार्गांतील भिन्नता किंवा एकत्त्व आपणास नीट कळेल. जर परमेश्वर प्राणिमात्राच्या प्रत्येक वैशिष्ट्यांत सत्य स्वरुपामध्यें असेल तर हें प्रत्येक वैशिष्ट्य नीट समजावून घेऊन सर्व विश्वाची रचना परमेश्वर निर्मित कशी आहे ? याचा बोध आपणास होईल. हाच मार्ग परमेश्वराच्या सगूण, साकार स्वरुपाचे ध्यान करणारे, निरनिराळया आकारांचे व गुणांचे देव–देवता मानणारे किंबहुना ३३ कोटी देव–देवता आहेत असे समजणारे आम्ही हिंदु लोक याच विचारसरणीचा अवलंब करीत आहोंत असे म्हणावे लागेल. इतकेंच नव्हे तर आदिभौतिक विश्वाचे कोडे विज्ञानाच्या दृष्टीनें सोडवूं पहाणारे आमचे सर्व वैज्ञानिक आणि शास्त्रज्ञ ह्याच विचारसरणीचा अवलंब करीत आहेत असें दिसून येते. जग ही केवळ माया आहे म्हणून जगातील प्राणिमात्र भ्रममूलक असून सर्व विश्व निर्मिति हाच मुळात एक भ्रम आहे. परमेश्वर जगासारखा आकार, रंग, रुपयुक्त मुळींच नसून निर्विकार, निर्विशेष आहे व जगांतील प्रत्येक प्राणिमात्रांत त्याचें केवळ प्रतिबिंब पडले आहे. ही विचारसरणी सोडून प्राणिमात्राच्या प्रत्येक वैशिष्ट्याला म्हणजेच जगाच्या आस्तित्वाला महत्त्व देणारी विचारसरणी त्या त्या वैशिष्ट्याचा अभ्यास करण्याकरितां मनाच्या एकाग्रतेचाच अवलंब करील व पातंजली सूत्रांतील वृत्ति–निरास करण्याकरितां सांगितलेली मनाची एकाग्रता सुद्धां याच सदरांत पडेल. आतां वृत्ति निरासासाठीं आहे असें धरलें तरी देखील मन एकाग्रतेच्याच मार्गांत पडत असल्यामुळें एका अर्थानें वैशिष्ट्याचा अभ्यास करण्यासाठीं लागणाऱ्या साधनांचा अवलंब करणारीच ठरेल.

## संभ्रमांतून सोडवणूक

उलट पक्षीं साक्षीत्वाचा अभ्यास करीत असतांना चित्तवृत्तींचा निरोध न करितां चितवृत्ति एकामागे एक उठत असतात. त्यांच्या अवकाशांत डोकावण्याच्या सहज क्रियेला मन एकाग्रतेच्या अभ्यासाचे वावडे असल्याकारणानें तो अभ्यास प्राणिमात्रांच्या वैशिष्ट्याचा होऊं शकेल किंवा नाहीं असा प्रश्न आपल्याला पडेल. या संभ्रमातून सोडवणूक फक्त एकाच तऱ्हेनें करतां येईल आणि ती म्हणजे परमेश्वर हा निर्गुण व सगून असा दोन्हीही आहे म्हणजे वृत्ति-निरासातही असला पाहिजे व वृत्ति उठावातही असला पाहिजे. म्हणजे परमेश्वराचे स्वरूप नुसते सामान्य म्हणजे Abstract नसून विशेष म्हणजे concrete असले पाहिजे. म्हणजेच तो गुण, रंग, रुप, नाम, आकार, देश, काल, सहीत असला पाहिजे व तसाच तो निर्गुण निराकार रंग, रुप, आकार, देश, काल ह्याच्यापलीकडे पण असला पाहिजे. म्हणजे सोप्या भाषेंत जे निर्माण झाले ते पण परमेश्वर व जे निर्माण झाले नाहीं ते पण परमेश्वर. परमेश्वर हा त्याच्या एका अंशाने सर्व ब्रह्मांड निर्माण करून उरलेल्या ९९ अंशाने निर्मितीच्या बाहेर आहे. तेच अंतिम सत्य आहे. या अंतिम सत्याच्या शोधार्थ आपल्याला दोन्हीहि मार्ग हाताळले पाहिजे; कारण ते एकमेकास पोषक असून अंगभूत अथवा निगडीत झाले आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात तसाच हा प्रकार आहे.

## चित्तवृत्तींचा निरस

या दोन्ही मार्गांचा अवलंबनामध्यें क्रम लावण्याची मात्र आपल्याला आवश्यकता आहे. याचें कारण म्हणजे मानवी मनांचा स्वभाव. मानवी मन वैशिष्ट्यांत गुंतलें तर त्याला नाम, रूप, रंग, आकार ह्यांतून बाहेर पडून त्याच वैशिष्ट्याच्या मागील सामान्यत्व लवकर कळत नाहीं. किंबहुना त्याला सामान्यत्वाकडे जाण्याची इच्छाच होत नाहीं. यासाठीं प्रथमतः ज्या सामान्यावर वैशिष्ट्याची उभारणी झाली तें सामान्य कळण्यासाठीं चित्तवृत्तींचा निरास करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कारण सवयीमुळें व बहिर्मुखतेमुळें आपल्या प्रत्येक विचारा-विचारांत व वृत्ति-वृत्तींत जगांतल्या वस्तु आणि प्राणिमात्रांचा ठसा उमटलेला असतो व त्याबरोबरच त्या वस्तू अगर प्राणिमात्रांच्या अनंत स्मृति व झालेले संस्कार त्या विचार आणि वृत्तींना विकारयुक्त करून काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांच्या खाईत लोटतात व त्यामुळें त्यामागील सामान्यत्व नजरेआड होते. तें सामान्यत्व शोधून काढण्याकरितां मनांत उठणाऱ्या प्रत्येक विचाराला व वृत्तीला आपण नीट तपासून पाहिलें पाहिजे व त्यांतील विकार काढून टाकून त्यामागील


सामान्यत्व आपल्याला पाहिलें पाहिजे. त्या सामान्यत्वाला जसे विकार झाकाळतात तसे विचार पण झाकाळतात. म्हणून त्याच्या चांगल्या अथवा वाईट संस्काराला कांहीं काल बाजूला सारणें अत्यावश्यक आहे. विचार आणि वृत्ति अशा तऱ्हेने शुद्ध झाल्यावर निर्मळ पाण्याच्या तलावाचा तळ जसा आपणाला स्पष्ट दिसतो तसेच विशिष्टाखालील सामान्यत्व आपल्याला स्पष्ट दिसूं लागते. याकरितां मनाचा सर्वांच्या सर्व भाग तपासून पहाणें प्राप्त आहे. मन एकाग्रतेमध्यें मनाचा सर्व भाग तपासतां येत नाहीं. जिकडे लक्ष द्यावें तितकाच भाग फक्त दिसतो; यासाठीं मन एकाग्रतेचा अभ्यास न करितां 'Choiceless selfwareness'चा अभ्यास करणें जरूर आहे, व याबाबतींत पातंजलींच्यापेक्षां जे. कृष्णमूर्ति आणि पूर्वाचार्य यांचें म्हणणें जास्त ग्राह्य ठरतें.

## दुःखाचे नि आनंदाचे विचार

मानवी विचार हा खरें पाहिले असतां परमेश्वराच्या सत् चित् आनंद ह्या तिन्ही घटकांपासून निर्माण झालेला असतो; परंतु तो चित् आणि सत् या दोनच घटकांमधून निर्माण झाल्यासारखा वाटतो. परंतु परमेश्वराचा तिसरा घटक जो आनंद त्याचा अनुभव आपल्याला प्रत्येक विचारामध्ये येत नाहीं तसा अनुभव जर प्रत्येक विचारांत येता तर आपल्या मनांत उद्‌भवलेला प्रत्येक विचार आनंदमयच झाला असता. परंतु आपला अनुभव याच्या अगदीं उलट असतो. आपल्या मनात दुःखद, भीतिप्रद विकारयुक्त विचारच जास्त येतात व शुद्ध आनंदाचे विचार जवळ जवळ कधींच येत नाहींत. आपल्या आत्यंतिक आनंदाचे विचार सुद्धा सुख-दुःख मिश्रित असतात. तर दुसऱ्या शेकडो विचारांची गोष्ट काय ? परंतु वरील पद्धतीनें जर आपण प्रत्येक विचाराकडे पाहिले तर वृत्ति वृत्तीमधला भीति, द्वेष, मत्सर, लोभ, काम, क्रोध याच विकारांचा पूर्ण निरास होईल व त्यांत आपणास सामान्याची अनुभूति येईल. परमेश्वराच्या आनंदाच्या घटकाचें महत्त्व इतर दोन घटकापेक्षां एवढे मोठें आहे कीं त्या अपरंपार आनंदामध्यें शुद्ध वृत्ति आणि विचार पूर्णपणें डुबूनच जातील व अगदीं मूळ स्वरूपाचा 'मी'चा विचारसुद्धां त्यांत रहाणार नाहीं. मग अहंभाव म्हणून आपण जो समजतो तो तर दूरच राहील. थोडक्यांत या वरील मार्गाचा अवलंब केल्यास केवळ 'अहं ब्रह्मास्मि' ही स्थिती नाहींशी होऊन त्या ठिकाणीं 'सर्वं खुलु इदं ब्रह्म' ही वृत्ति आपणास प्राप्त होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. साक्षात्कार, साक्षात्कार म्हणतात तो याहून वेगळा आहे काय ?

**द्वेषभावनेचें महत्त्व**

अशा तन्हेनें वरील मार्ग प्रथम क्रमांकाने पत्करून प्रत्येक वैशिष्टयामागील सामान्यत्व कळून एकदा का आपणास निर्गुण निराकार निर्विशेष अशा परमेश्वराचे स्वरूप कळले कीं नंतरच विशेषत्वाकडे आपण वळावे. विशेषत्वाचा अभ्यास नंतर फारच सुलभ असा होतो. विशेषत्वाचा अभ्यास करण्यासाठीं आपण होऊन मन एकाग्र करण्याची जरुरी रहात नाहीं. प्रथम क्रमांकाच्या मार्गांचा अवलंब केल्यामुळें मनाला आपोआपच एकाग्रता साधण्याची सवय झालेली असते व नंतर झालेल्या प्रत्येक विचाराचा, वृत्तीचा उठाव आपल्याला वैशिष्टयाने नटलेला दिसूं लागतो. त्यांत उठणारे विकारसुद्धां आपणास चंद्रावरील डागाप्रमाणें किंवा सुंदर मुखाला दृष्ट लागूं नये म्हणून लावलेल्या गालबोटासारखे दिसूं लागतात. मानवी मनामधील विकार विचार या सर्वांची स्थाने कशी एका विशिष्ट वैशिष्टयानें नटलेली आहेत हे कळून आल्यावर विविध मानवी मनें निर्माण करणाऱ्या परमेश्वराबद्दल कौतुकच वाटू लागते. कामवासना नसती तर त्याची उलट बाजू जे शुद्ध प्रेम ते कळले नसते. लोभ नसता तर परमेश्वराचे निर्गुण निराकार स्वरूप पाहिल्यावर त्यावर मोहानें झडप घालण्याची वृत्तीच माणसांत निर्माण झाली नसती, द्वेष-भावना नसती तर जग आणि परमेश्वर व परमेश्वर आणि जग या मानवी मनाच्या आंदोलनाला गतीच मिळाली नसती. मद [ अहंभाव ] नसता तर अहं 'ब्रह्मास्मि' ही स्थिति निर्माण झाली नसती, मत्सर नसता तर ' उद्धरेत् आत्म आत्मानं किंवा 'अमृताते ही पैजा जिंके' यांत ईर्षेनें आपण शर्यती ही लावल्या नसत्या; म्हणून या दोन्ही मार्गांचा अवलंब केल्यानंतर परमेश्वरानें जें जें निर्माण केलें आहे तें-तें त्या-त्या जागीं त्या-त्या स्थितींत जसें आहे तसें योग्य व व्यवस्थित आहे त्यांत आपण कांहींही बदल करूं शकत नाहीं हा बोध होतो. ' योगः चित्तवृत्ति विरोधः ' या अष्टांग योगाच्या मार्गानें हटानें निर्गुण निराकाराचें स्वरूप जाणतां येत नाहीं असें नाहीं. परंतु क्रमांकानें या मार्गांचा अवलंब केल्यास या दुसऱ्या मार्गांतील हट नाहींसा होऊन दोन्ही मार्ग सुलभ होतात. हे दोन्ही मार्ग एकमेकांस पोषक कसे आहेत व एकमेकात निगडींत कसे आहेत हें दाखविण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. फक्त क्रमांक पाळावा असें वाटतें.




# संत चांगदेव

संत चांगदेव हे ज्ञानेश्वर काळांत फार मोठे सत्पुरुष होऊन गेले. ज्ञानेश्वर–भगिनी संत मुक्ताबाई हिनें त्यांना उपदेश दिला—

चांगदेवानें प्रथम हठयोगाचा अभ्यास केला. या हठयोगानें खरें आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं, असा त्यास अनुभव आला व तो शेवटीं परमार्थमार्गाकडे वळला. चांगदेव चौदाशें वर्षें जगला अशी एक परंपरागत दंतकथा आहे. हें केवळ अशक्य आहे, हें उघड आहे. चांगदेवास चौदा निराळीं नांवें होतीं असें निळोबा सांगतात. याचा अर्थ एवढाच कीं, चांगदेव नांवाचे अनेक साधू होऊन गेले किंवा एकाच चांगदेवास तो निरनिराळ्या ठिकाणीं गेल्यावेळीं निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं, किंवा 'चांगदेव' हें एक सर्वांस संबोधितां येईल असें सामान्य नांव होतें. या चौदा नांवामुळें तो चौदाशें वर्षें जगला असें मानण्यांत आलें असावें. पंडित-जनांस भिन्न नांवांनीं संबोधण्याची फार प्राचीन परंपरा आहे. 'विप्र', 'फकीरजिंदा', 'रामीरामदास' इत्यादि नांवें रामदासांचींच होतीं असें रामदासाचे चरित्रकार आत्माराम आपल्या 'दासविश्रामधाम' या ग्रंथांत म्हणतात. चांगदेवाच्या बाबतींत हीच गोष्ट घडली असावी. चांगदेव–पांसष्टींत दोन नांवें जास्त प्रामुख्यानें निर्दिष्ट आहेत : वटेश चांगा व चक्रपाणी चांगा—हीं दोन्ही नांवें एकाच व्यक्तीचीं आहेत, असें मानलें पाहिजे. चांगदेवाच्या इष्टदेवतेच्या नांवामुळें त्यास वटेश चांगा हें नांव प्राप्त झालें असावें. हठयोगामुळें चांगदेवास कांहीं सिद्धी प्राप्त झाल्या असाव्यात असें दिसतें, परंतु श्रीज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांची नि चांगदेवाची गांठ पडतांच त्याचा योगसामर्थ्याचा सर्व गर्व नाहींसा झाला व त्यास खऱ्या आत्मज्ञानाची तळमळ लागली. याच सुमारास श्रीज्ञानेश्वरांनीं चांगदेव-पांसष्टी" लिहिली असावी. त्यांत चांगदेवास अद्वैताचा उपदेश केला आहे. चांगदेव – पांसष्टींत चक्रपाणीचा उल्लेख आहे. यावरून हा चक्रपाणी व महानुभाव पंथाचे चक्रधर हे एक असून हें त्याचें लिखाण असावें असें चांदोरकरांनीं प्रतिपादिलें आहे. परंतु. चांगदेव-पांसष्टी ही या चक्रधराची नव्हे, हें आम्हीं पुढें सिद्ध केलेंच आहे. चांगदेव–पांसष्टी व श्रीज्ञानेश्वरांचे इतर सर्व ग्रंथ

यांमध्यें जें अनेकविध साम्य आहे, त्यावरून चांगदेव–पासष्टी श्रीज्ञानेश्वरांनींच लिहिली आहे हें उघड आहे. अभंगांप्रमाणें चांगदेव–पांसष्टीच्या बाबतींतहि या अनेकविध साम्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. चांगदेव–पांसष्टीतील प्रत्येक वाक्यागणिक श्रीज्ञानेश्वरांच्या इतर ग्रंथांतून समानार्थी वाक्यें दाखवितां येतील, असें एका लेखकानें सिद्ध केलें आहे. चांगदेवास मुक्ताबाईनीं उपदेश दिला असावा असें दिसतें. श्रीज्ञानेश्वरांच्या मरणानंतर अजमासें दहा वर्षांनीं चांगदेव गोदातटाकी शके १२२७ ( इ. स. १३०५ ) सालीं वारले. “ निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई यांच्या अध्यात्मज्ञानाचा मी परिपाक किंवा पक्व फळ आहे.” असें चांगदेव मोठ्या अभिमानानें सांगतात. पुढील सुंदर अभंगांत त्यांनीं आपला अनुभव सांगितला आहे.

मोतिरायाचें पाणी रांजण भरला । पोट भरुनी प्याला ज्ञानदेव
भ्रमाची साउली धरोनिया हातीं । गेलासे एकांतीं निवृत्तिदेव
पुष्पाचा परिमळ वेगळा काढिला । तो हार लेइला सोपानदेव
हिऱ्याच्या घुगऱ्या जेवण जेवली । पोट भरुनी धाली मुक्ताबाई
चौघांचें वर्म आलें असे हातां । वटेश्वर स्वतां तये ठायीं.



—शिर्डी संस्थान समितीचे आजीव सभासद आनंदराव ग. भाईंदरकर ( मुंबई ) हे ता. २३–१२–६६ रोजीं माजी ट्रस्टी व सभासद वसंतराव ना. गोरक्ष-कर ( सांताक्रूझ ) हे ता. २३–३–६७ रोजीं व सभासद चिंतामण मा. चौवळ ( पुणें ) हे श्रीसाईचरणीं विलीन झाले.

# ‘ सर्व धर्मान् परित्यज्य ’

—बा. मा. मगदूम

स्थानकावर अनेक ठिकाणी जाणाऱ्या व येणाऱ्या गाड्या असतात, पण आपण एकाच विशिष्ठ ठिकाणी जाणाऱ्या गाडीत प्रवेश करतो. त्याप्रमाणें भक्तिमार्गातही अनेक विचारप्रवाह असतात. यासाठीं कोणत्यातरी एका तत्त्वाचा अंगीकार करणें विहित, युक्त, श्रेयस्कर असते. हाच ‘ सर्व धर्मान् परित्यज्य ’ या श्लोकाचा अर्थ होय.’ ‘जीवन ही एक व्याधी आहे. ज्याप्रमाणें उपकार पथ्य व श्रद्धा यांनी देहाची व्याधी’ हटविता येते, त्याप्रमाणें भक्ति व श्रद्धा, यानी भवरोग दूर करून ‘ आत्मिक विकास साधता येतो.

ज्याप्रमाणें रणभूमीवर लढणाऱ्या योद्धयाला एक विशिष्ठ गणवेष धारण करावा लागतो, तद्वत् अध्यात्ममार्गात एका विचारपद्धतीचा अवलंब करणें इष्ट असते. हा भक्तिमार्गातील एकात्मवाद होय. ‘ अनेकात्मवाद ’ व एकात्मवाद ही मुख्यतः एकच आहेत. पण सद्भक्तांनें एकत्मवादाचा अवलंब करावा. यासाठीं मामेकं शरणं व्रज ॥ असें भगवंतानी म्हटले आहे. कारण विशाल भक्ति ही सकाम असते, पण एकात्म भक्ति निर्भर व मुक्त असते. पर्वतासारखी स्थिर व अचल असते. परिस्थितीच्या व दुर्दैवाच्या भयानक लाटा थोपवून धरण्याचे तिच्याठाई सामर्थ्य असतें. श्रेष्ठ प्रकारचे कर्तव्याचरणही ( एकात्म : श्रद्धेनेच ) घडू शकते. हे मिशनरी लोकांच्या आत्यंतिक धर्मनिष्ठेवरून दिसून येते.

सकाम व निष्काम हे भक्तीचे दोन प्रकार मानले जातात. पण ते परस्परावलंबी आहे. ज्याप्रमाणें पायाशिवाय इमारत बळकट होत नाहीं. तद्वत् ‘ सकाम भक्तीच्या इमारतीला ’ निष्काम भक्तीचा पाया असणें आवश्यक आहे. श्रेष्ठ प्रकारची भक्ति व श्रद्धा म्हणजे ‘ समर्पण, श्रेष्ठ प्रकारचे समर्पण हे आईच्या दुधासारखे असते. हीच भक्तीमार्गातील ’ मूलभूत प्रेरणा व नैसर्गिक शक्ति होय. यासाठींच शरण मजा आला आणि वाया गेला ! दाखवा, दाखवा ऐसा कोणी ॥ असें बाबांनीं निर्धारानें सांगितलें आहे. छंद, निष्ठा व एकरूपता या एकात्म भक्तीच्या तीन अवस्था आहेत.

" सर्वं धर्मान् परित्यज्य, म्हणजे सकल मोहविकारांचा व दुष्ट रूढींचा त्याग करणें; व 'मामेकं शरणंव्रजः ॥ म्हणजे परमेश्वराच्या कृपेला पात्र ठरणें. क्षमता, कसोटी व समर्पणता ही अध्यात्मिक यशाची मुख्य अंगें आहेत. म्हणून 'तुकोबानें' आपुलें मरण पाहिलें मी डोळा। तो झाला सोहळा अमृताचा ॥ असें म्हटलें आहे. सुतासारखे क्लिष्ट व यांत्रिक जीवन जगण्यापेक्षां श्रेष्ठ आत्मानंद देणारे अध्यात्मिक जीवन जगणें ही मानव जन्माची इतिकर्तव्यता आहे. अध्यात्म हें आत्मोद्धार घडविणारें शास्त्र आहे. परमेश्वराची ओळख पटविणारे माध्यम आहे. 'ज्यावेळीं गडगडाट होऊन पावसानें पृथ्वि जलमय होते, आकाशांत विजा चमकू लागतात, जीव भयानें व भुकेनें कासावीस होतो, त्यावेळीं सदैव हे विश्वचालका 'साईबाबा, तुझें आम्हांला स्मरण राहो, हीच तुझ्या चरणीं प्रार्थना।

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील
छबिलदास रोड, दादर (W. R.),

# वाल्मिकी रामायणांतील कांहीं बोध–वचनें

वाल्मिकी रामायण हा आपला एक प्रमुख धर्म–ग्रंथ आहे. हजारो वर्षांपासून या ग्रंथानें जनमनाची पकड घेतलेली आहे नि आम्हां हिंदवासीयांचें शील बनविण्यास तो थोर ग्रंथ कारणीभूत झालेला आहे. त्यांतील कांहीं बोधवचनें आजही प्रत्येकानें आचरणांत आणावीं अशीं महत्त्वाचीं आहेत.

( १ ) आपल्या वडिलांची आज्ञा पालन करणें व त्यांच्या इच्छेला जास्तींत जास्त मान देणें हा मोठ्यांत मोठा धर्म आहे.

( २ ) आपला वडील भाऊ, वडील व गुरुजी हे तिघेही आपणास पूजनीय वाटावे व त्याप्रमाणें त्यांच्याशीं आपली वागणूक आदराची असावी.

( ३ ) आपला धाकटा भाऊ, आपला पुत्र व आपला शिष्य ! ह्या तिघांनाही आपण पुत्रप्रेमानें वागविणें हें आपलें परम पवित्र कर्तव्य आहे असें मानलें पाहिजे.

( ४ ) एखादी महिला कितीही सद्गुणी असो, तिनें कितीही व्रतें, उपोषणें केलेलीं असोत, परंतु ती जर का आपल्या पतीच्या आज्ञेबाहेर जात असेल व त्याचा शब्द पालन करीत नसेल तर तिच्यासारखी पापी तीच होय.

( ५ ) इच्छा, लोभ फार वाईट आहे. त्यामुळें तीन दुर्गुणास मिठी मारण्याची पाळी आपल्यावर येत असते. खोटें बोलणें; स्त्रियांच्या मागें लागणें व वैरभाव नसतांही अत्याचारास प्रवृत्त होणें या तिन्ही गोष्टी घातक आहेत.

( ६ ) चारित्र्यशील, हा स्त्रियांचा सर्वांत मौल्यवान् अलंकार आहे.

( ७ ) मैत्री ही प्रेमानें वृद्धिंगत होत असते. प्रेम द्यावें आणि प्रेम घ्यावें.

( ८ ) माणसाकडून चुका ह्या घडावयाच्याच.

( ९ ) कोणाही जिवंत प्राण्याची आपल्याकडून हत्या घडूं नये. त्यांचें रक्षण करणें हा आपला पवित्र धर्म आहे.

( १० ) ममता, करुणा, दया हा सर्वांत मोठा सद्गुण आहे.

(११) कोणत्याहि बाबतींत अतिशयोक्ति करूं नये. त्यामुळें संकटें निर्माण होतात.

(१२) मित्र मिळविणें सोपें असतें, परंतु ते राखणे मात्र फार कठीण असतें

(१३) गृहसंसारांत गृहस्थाची गृहिणी ही फार महत्त्वाची व्यक्ति आहे.

(१४) नशिबाचा हवाला कोण देतात? जे भित्रे, कर्तृत्वशून्य नि आळशी असतात तेच.

(१५) नदींतील पाणी सर्व वाहून गेल्यानंतर धरण बांधण्यांत फायदा कोणता?

लहान मुलांच्या आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध
जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी
सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.
: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# निवृत्तिनाथ व ज्ञानदेव याची शिकवण

—गुरुदेव रानडे

## श्रीनिवृत्तिनाथांची शिकवणूक

भगवद्गीतेप्रमाणें श्रीनिवृत्तिनाथ संसारास सद्वृक्षाची म्हणजे अश्वत्थवृक्षाची उपमा देतात. श्रीगुरूंच्या कृपेशिवाय हा संसारवृक्ष मुळासकट उपटून टाकतां येत नाहीं असें श्रीनिवृत्तिनाथ म्हणतात. या वृक्षास माया–पल्लवी नाहीं व छायाहि नाहीं; परंतु, त्याची या जगांत सर्व सत्ता चालते. सर्वां घटीं वसत असलेला आत्मा आम्हांस गुरुकृपें प्रत्यक्ष दिसला, असें श्रीनिवृत्तिनाथ म्हणतात. प्रत्यक्ष हरीस जो आपल्या डोळ्यांना दाखवील अशा पुरुषासच सद्गुरु करावा. त्यास तन, मन व धन अर्पण करावें आणि त्याच्यापासून वस्तु मागून घ्यावी. ज्या साधकाच्या वासना शुद्ध झाल्या व मनांत चोख भाव निर्माण झाला, त्यालाच देव भेटतो. परनिंदा व परापवाद ऐकतांच कान झांकून निजमौनानें जप करावा. आत्म–स्तुति कधींहि ऐकूं नये. विष्णुपणें आपलें भान हरपूं द्यावें. गुरुकृपेनें अंधाऱ्या रात्रीं हा सूर्य उगवला व कृष्णहरि चराचरीं प्रकाशला. हरिकथा चंदनाच्या परिमलापेक्षांहि गोड आहे. ब्रह्माचा सुहास जाई–जुई–मोगऱ्याच्या वासापेक्षां अधिक सरस आहे. श्वासाच्या तंत व वितंतांमध्यें म्हणजे उभ्या व आडव्या दोऱ्यांमध्यें अनाहत नाद उमटला. हरि हा चंद्रमा आहे; आम्ही भक्त चकोर पक्ष्याप्रमाणें त्याच्या दर्शनासाठीं तळमळतो. आम्ही देही, तो आत्मा; आम्ही विदेही, तो परमात्मा. निवृत्ति चातक हरीसाठीं वरती पाहात आहे. देवाच्या दर्शनासाठी विशिष्ट काळ, वेळ नाहीं. आम्हांस ज्योतिरूप हरि अखंड तसाच सदा सर्वकाळ दिसतो. देव दृष्टीस पडला कीं, सर्व जग नाहींसें होतें. सूर्य, चंद्र, तारा, मेदिनी, आकाश वगैरे कांहींच दिसत नाहीं. विश्वाच्या सांदी–कोपऱ्यांत देव ठेंचून भरून राहिला आहे. सर्व विश्व देवरूप होतें व देव–भक्तांमध्यें कांहींहि भेद उरत नाहीं. समुद्रास भरती–ओहोटी येते, त्याप्रमाणें देव–भक्त आहेत.

## श्रीज्ञानेशांची शिकवण

देवाशिवाय इतर सर्व गोष्टींबद्दल गाढ अज्ञान असावें, असें श्रीज्ञानदेव म्हणतात. एका विठ्ठलाला जाणणें हीच भक्ति व हेंच ज्ञान. संसारीं जन्मून मनुष्य आपला आपण वैरी झाला. हा देह, पुत्र, दारा, धन माझें म्हणणाऱ्यांस हें सर्व-काळाचें म्हणजे मृत्यूचें अन्न आहे, हें कळत नाहीं. पिंजऱ्यांतील पोपटाला आपण नलिकेला बांधलों गेलों आहों, असा खोटा भ्रम होतो, त्याप्रमाणें आम्ही या सर्व वस्तूंच्या मोहांत मोहांत व्यर्थ पडतों. पाण्यांतील माशांवर लक्ष ठेवून बगळा वरवर डोळे मिटून ध्यानस्थ राहतो, त्याप्रमाणें आम्ही रानांत जाऊन तप करतों; पण मनांत स्त्रीचें चिंतन करितों.

# धन्य हनुमानजींची निःस्वार्थ भक्ति !

आजच्या किंवा मागील कोणत्याही काळांत ज्याप्रमाणें गणेश गणपति ही इच्छिलेलें देणारी व सर्वांकडून भक्तिभावाचा प्रणाम घेणारी देवता आहे त्याचप्रमाणें श्रीरामभक्त हनुमान. हेंच पहाना. कोणत्याही खेड्यांत जा. तेथें गणपतीचें किंवा मारुतीचें अथवा दोघांचेंहि एक तरी देवालय तुम्हांला आढळून आल्याशिवाय रहाणार नाहीं. एवढा थोर महिमा आहे मारुतीरायाचा.

रामनामाचें सामर्थ्य अचाट तसेंच अगाध आहे. वाटेल तें घडवून आणणारें तें नाम आहे. त्याचें महात्म्य वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं. त्या नांवानें जशा आश्चर्यकारक गोष्टी घडून आल्या आहेत, त्याचप्रमाणें मारुतीरायाच्या नांवाचेंही फार महत्त्व आहे. तें नांव भक्तिभावानें घेण्यांत आलें पाहिजे. त्या नांवांत फार मोठी जादू आहे. 'हनुमान–कवच' फार प्रसिद्ध आहे.

'हा पवननन्दनाय स्वाहा' हा दहा अक्षरी एक मंत्र आहे. त्याचें महत्त्व थोर अशा गुरूकडून समजून घेण्यांत यावें.

हनुमानजी हे चिरंजीव आहेत. त्यांच्या भक्तांना आजच्यासारख्या काळांतही त्यानीं दर्शन दिल्याचे दाखले आहेत. आणि तें सत्य आहे. रामायण जोपर्यंत या पृथ्वीतलावर भक्तिभावानें वाचलें जाईल तोपर्यंत हनुमानजी आपल्यांत निश्चितपणें वावरत रहाणार.

हनुमानजींची सेवा ही निःस्वार्थ होती. आपल्या अशा सेवाभावानें त्यानीं आम्हां सर्वांपुढें उच्चादर्श ठेविला आहे.




## मार्च १९६७

या महिन्यांत भक्तांची गर्दी नेहमींप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. श्रीपाद बाळकृष्ण ऊर्फ बाबूराव देव, ठाणें.

साई संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांची या महिन्यांत माघ व॥ ११ श्रीरामदास नवमी, महाशिवरात्र, फा. शु॥ ११ श्रीतुकाराम बीज, श्री एकनाथषष्टी अशी सहा ६ कीर्तनें श्रीसमाधी मंदिरांत झाली.

**गायन—**

श्री. विश्वास अर्जुन कांबळी, माहीम, मुंबई १६

श्री. विश्वनाथ श्रीनिवास शेजवाडकर, परेल, मुंबई १२

श्रीमती गिरजाबाई आणि पार्टी मद्रास ( भजन ) तेलगू

श्री. इच्छाशंकर हरजीवन जोशी, मुंबई ६

**पालखीची मिरवणूक**

( महाशिवरात्र ) या दिवशीं गांवांतून पालखीची मिरवणुक निघाली. रात्रीं ९ ते १० पर्यंत.

**रथाची मिरवणूक**

( रंगपंचमी ) या दिवशीं गांवांतून रथाची मिरवणूक निघाली. दिवसा ५॥ ते ६॥। पर्यंत व रंग उडविणें प्रत्येकाचे तोंडास रंग फासणें वगैरे झालें.

**भक्तांच्या भेटी**

( १ ) मे. एम्. एन्. सावंत, अंडर सेक्रेटरी होम डिपार्टमेंट,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

( २ ) रामकृष्ण अय्यर, फायान्शिअल ॲडव्हाईसर नव्हमेंट ऑफ
महाराष्ट्र, मुंबई

( ३ ) मे. डी. व्ही. जुन्नरकर असि. कमिशनर ऑफ इन्कम् टॅक्स, नाशिक.

( ४ ) एन्. एस. कामटे, आय. जी. ( रिटायर्ड ) जे. पी. मुंबई.

**" साई भक्तांस अमूल्य संधी "**

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह ( स्टँप-तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
**श्री साईलीला मासिक**

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४–०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १–०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (१७) | Guide to Shirdi | (English) | | ००–१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

व्ही. पी. ची पद्धत नाहीं.

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00–37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

क : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.